# श्री साईलीला



ऑक्टोबर १९७९ ]    विजयादशमी विशेषांक    [ किंमत ६० पैसे

## श्रीसाईबाबा ६१ वी पुण्यतिथी विशेषांक

**जगा लावावे सत्पथीं । हेचि साईलीलेची कृती ॥**



## श्रीसाई वाक्सुधा

हो हा सकळ गुणखाणी ।
साई निजभक्त कैवल्य दानी ।
कथा जयाची कालेमलहरणी ।
श्रोतां श्रवणीं परिसिजे ॥ ९९ ॥

ऐसिया संतकथां पुढें ।
सर्व सौख्य तें काय बापुडें ।
कोण ढुंकूण पाहील तिकडे ।
टाकून रोकडे सत्कथन ॥ १०० ॥

सुख दुःख हे तों चित्तविकार ।
सत्संग सर्वदा निर्विकार ।
करी चित्त चैतन्याकार ।
सुख दुःखां थार देईना ॥ १०१ ॥

जे सुख विरक्ता एकांतीं ।
कीं जें भक्ता करितां भक्ति ।
असो इंद्र कीं चक्रवर्ती ।
न मिळे कल्पांतीं तयांना ॥ १०२ ॥

प्रारब्ध भोग बलवत्तर ।
बुद्धि उपजे कर्मानुसार ।
उपजो परी हे नेमनेमांतर ।
भक्त तत्पर टाळील ॥ १०३ ॥

—श्रीसाईसच्चरित–अध्याय ३७ वा

# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५८ वे ] ऑक्टो. १९७९ [ अं. ७

: संपादक :

श्री. क. हि. काकरे,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६—०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४–बी,

डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३३ ६१

# अनुक्रमणिका – अक्टोबर १९७९


१) संपादकीय — साईबाबासारखा देव नाही

२) साई ६१ वी पुण्यतिथी–प्रवचनकार–प्रा. शिवाजीराव भोसले.

३) तपोविभूती गणेशलालजी महाराज — श्री. क. ही. काकरे

४) श्रीसाई मूर्तीची २५ वर्षे — श्री. सदानंद चेंदवणकर

५) शिरडीचे साईनाथ व साकुरीचे उपासनी बाबा — डॉ. शां. ना. टिपणीस

६) वंदितो श्रीसाईनाथा — श्री. बाबुराव अर्नाळकर

७) भक्तांचे परिपालन — डॉ. रा. सि. कापडी

८) श्रीसाईबाबांची चावडी — डॉ. म. स. बाबरे

९) श्रीकृष्णसाई स्वयमेव मृगेंद्रता — डॉ. अनिल जायस्वाल

१०) ६१ वी पुण्यतिथी कार्यक्रम पत्रिका — —

११) श्रीसाईनाथाय नम: — कु. जयंती जोशी

१२) तुम्ही संतजन — प्रा. र. श्री. पुजारी

१३) तू माझा त्राता — श्री. शंकर इनामदार

१४) शिरडीवृत्त — —

## संपादकीय —

न. वि. वि.

# ❀ साईबाबांसारखा देव नाही ❀



संत चूडामणि भगवान श्रीसाईबाबांची एकसष्ठावी पुण्यतिथी आज सर्वत्र साजरी होत आहे. ऑक्टोबर महिन्याची पहिली तारीख, विजयादशमी उर्फ दसरा श्रीसाई बाबांचा निर्वाण दिन आणि यातच भर म्हणून की काय शिरडी समाधी मंदिरात प्रतिष्ठापना केलेल्या सुंदर, अनुपम, लावण्यमय अशा मूर्तीला २५ वर्षे पूर्ण होत आहेत. मूर्ती स्थापनेचा रौप्यमहोत्सवही याच महोत्सवात साजरा होत आहे हा खरोखरच त्रिवेणी संगम होय. दरमहा प्रसिद्ध होणाऱ्या वाचक भक्तांच्या अत्यंत आवडत्या श्रीसाईलीला मासिकानेही या उत्सवात भर टाकण्याचा यत्न केलेला आहे, व त्या निमित्याने या अंकात वाचनीय रंजक साहित्य थोरामोठ्या साईभक्तांचे मोठ्या ाने मिळविले आहे, व हा अंक सजविला आहे. या उत्सवानिमित्य जाहिर ेल्या निबंधस्पर्धेचा निकालही इतरत्र अंकात दिला आहे.

साईभक्तांनो, आपणाला माहितच असेल की श्रीसंत साईबाबा हे फार थोर महाराष्ट्रात होऊन गेले. त्यांची चरित्र गाथा ज्यांनी वाचली असेल त्यांना तर हे टके कबूलच करावे लागेल. बाबांनी आपल्या हयातीत अनेक चमत्कार करून खविले.

चमत्काराशिवाय नमस्कार नाही म्हणजे जो पुरुष चमत्कार दाखवितो तो ामान मानला जातो असे जरी असले तरी श्रीसाईचे चरित्र संपूर्णपणे चमत्काराने

भरलेले आहे व त्या मुद्यांवर त्यांना अवतार मानावे असे सुशिक्षित व चिकित्सक मंडळी म्हणतात. श्रीसाईबाबांना सर्व सिद्धी प्राप्त झाल्या होत्या असाही भक्तांचा खात्रीचा कयास आहे. सिद्धीचा फक्त सत्पुरुषांनांच काय त्या प्राप्त होतात व त्या सिद्धीच्या बळावरच सतपुरुष चमत्कार करून दाखवितात. श्रीकृष्णाने द्रौपदीचे सत्व राखले. नवनाथांपैकी श्रीनटसिद्ध नागनाथ हा बालपणी सवंगडी मुलाबरोबर खेळत होता तेव्हा त्यास श्रीदत्त दृष्टीस पडले. त्यांनी तो नारायणाचा अवतार असल्याचे समजून त्याला आत्मतत्वरूपाची जाणीव व्हावी म्हणून त्याला एक सिद्धी दिली. त्या सिद्धीशक्तीच्या जोरावर तो कुणासही इच्छा भोजन देत असे. बाबांनी अशा सिद्धीचे कितीतरी प्रयोग कितीतरी भक्तांना दाखविले आहेत. याचा प्रत्यय श्रीबाबांच्या आयुष्यात ठायीठायी येतो.

या भारतात संत पुष्कळ होऊन गेले परंतु श्रीसाईबाबांच्या सारखा संत विरळाच. वेड्यात वेडा, शहाण्यात शहाणा, ज्याला जे पाहिजे त्याला ते देणारा, साता समुद्राकडील मानवाचे सुद्धा रक्षण करणारा. मृत्यूच्या जबड्यातून, कृतांताच्या दाढेतून सुद्धा मानवाला सोडविणारा, हयातीतच नाही तर हयाती नंतर सुद्धा आपल्या तुर्बेतीतून स्वतःच्या हाडांना बोलविणारा, आपल्या समाधीच्या दर्शनाने मानवाना डोलविणारा, श्रीसाईसारखा संत पृथ्वीतलावर निर्माण झाला हे या पृथ्वीचे भाग्य आहे. पृथ्वी सर्व संतांना विसरली तो तिचा स्वभाव आहे. परंतु श्रीसाईना विसरणे यावत् चंद्र दिवाकरौ त्या पृथ्वीलाही शक्य नाही. श्रीसाईंचा अवतार परमेश्वराच्या दहा अवतारांनासुद्धा लाजवतो व मागे टाकतो. प्रभुरामचंद्राच्या अवतारस्मरणाने आपण पुनित होतो, श्रीकृष्णाच्या नामघोषाने, आनंदाने नाचू लागतो. भगवान बुद्धाच्या आठवणीने मानवावरच नाहीतर पशुपक्षावर कृमिकीटकांच्यावरही प्रेम करून आपण अहिंसा तत्वे शिकतो. भगवान येशू ख्रिस्ताचे चरित्र वाचून आपण शेजाऱ्यांवरही प्रेम करावयास शिकतो परंतु श्रीसाईंच्या स्मरणाने भवसागरातील आपल्या दैवाने निर्मिलेले भयानक भोवरे युक्तीने टाळून थेट भवसागर कायमचा तरून जाण्यासाठी एक अभेद्य कवच आपण प्राप्त करून घेतो हेच श्रीसाईबाबांचे व श्रीसाई अवताराचे वैशिष्ट्य आहे.

श्रीसाईंचे अनेक भक्त त्यांना साधकाचे सिद्ध झालेले मानीत नसून प्रत्यक्ष अवतार मानतात व महाराजांच्या लीला व त्यांची अदभुत् शक्ति पाहून त्यांना श्री कृष्णाचा अवतार मानणारे असंख्य आहेत. महाराज मात्र स्वतः आपल्याकडे तो अधिकार घेत नसत. ते बोलताना आपल्याला परमेश्वराचा सेवक 'बंदा' म्हणून घेत.

आपल्या गुरुचा आशिर्वाद आपल्याला पूर्ण आहे व त्याचेच कृपेने भक्तांची संकटे दूर होऊन त्यांचे कल्याण होते असे ते म्हणत ते स्वतःकडे कधीही मोठेपणा घेत नसत. ते कधीही 'अनलहक्क' म्हणजे मीच परमेश्वर असे म्हणत नसत. पण त्यांचा उच्चार वारंवार 'यादे हक्क' म्हणजे मी परमेश्वराची याद म्हणजे मी स्मरण करतो हा असे.

श्रीसाईबाबा हे महान अवतारी पुरुष होते. ते अयोनिज व आजानुबाहू होते. ते अनंतात विलीन झाले असले तरी ते अद्यापि हयात आहेत व आपल्या भक्तांना दर्शन देतात. ते संत होते, संत हे शास्त्रातील विधिनिषेधाच्या कक्षेतून बाहेर गेलेले असू शकतात. कौशीतकी उपनिषदात म्हटल्याप्रमाणे ज्याला परमतत्व प्राप्त झालेले आहे तो सर्व नियमांच्या पलीकडे गेलेला असतो, असा तत्वज्ञानी त्याने पूर्वी केलेल्या कर्मांच्या बंधनातून मुक्त झालेला असतो. अशा पुरुषाची इच्छा व शक्ती म्हणजे साक्षात् भगवंताची इच्छा व शक्ती होय हे संत जीवनातील वैशिष्ट्य होय. श्रीसाईबाबा हे पूर्णकोटीतील अवतार संत होत. त्यांनी विश्वनीयरित्या अनेक चमत्कार केले. त्यांचे जीवन स्वतःकरिता होते, ते परोपकारार्थ नव्हते असे कुणालाही म्हणता येणार नाही. त्यांनी केलेले चमत्कार म्हणण्यापेक्षा साईबाबा हाच चमत्कार आहे आणि म्हणून साईबाबासारखा अन्य देव नाही असेच म्हणावे लागते.

☆ ☆ ☆


लवकरच प्रसिद्ध होत आहे—

* तीन तासांच्या पारायणास अत्यंत उपयुक्त *

**र. श्री. पुजारी**

विरचित

## — श्रीसाईमाहात्म्य —

( चोवीस अध्यायी पोथी )


- 'योगसिद्धी' मासिकातून क्रमशः प्रसिद्ध होत असलेली.
- सोपी, सुंदर, रसोत्कट शैली.

जयश्री प्रकाशन, १९२ सदाशिव पेठ, पुणे-३०.

## श्रीसाईबाबा ६१ व्या पुण्यतिथीचे प्रवचनकार

# प्राचार्य श्री. शिवाजीराव भोसले

—सदानंद चेंदवणकर




● संत चुडामणि भगवान श्रीसाईबाबांचा ६१ वा पुण्यतिथी महोत्सव श्रीबाबांच्या चरण रजाने पुनित झालेल्या भूमीत यंदा पाच दिवस धूमधडाक्याने साजरा होत आहे. या निमित्याने महाराष्ट्रातील अध्यात्मिक क्षेत्रातील एक सुविध, नामवंत प्रवचनकार प्राचार्य श्री. शिवाजीराव अनंतराव भोसले एम. ए. एल. एल. बी. यांना मुद्दाम संस्थानने आमंत्रित केले आहे याबद्दल प्रवचन-कीर्तनाचा आख्यान-व्याख्यान ऐकण्याचा षोक असलेल्या साईभक्तास अत्यानंदच वाटेल.

प्राचार्य भोसले यांचा जन्म १५ जुलै १९२७ रोजी सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील कलेढोण येथे झाला. त्यांचे माध्यमिक शिक्षण साताऱ्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये व उच्चशिक्षण पुणे विद्यापीठाशी सलग्न असलेल्या वाडिया कॉलेज व

लॉ कॉलेजमधे झाले. तत्वज्ञान हा विषय घेऊन त्यांनी एम. ए. ची पदवी मिळविलेली आहे. ही भूषणावह गोष्ट आहे. श्री. शिवाजीराव गेली २२ वर्षे तत्वज्ञान याच विषयाचे प्राध्यापक असून त्यापैकीची १६ वर्षे ते फलटणच्या मुधोजी महाविद्यालयाचे प्राचार्य पद भूषवित आहेत. तत्वज्ञान हा त्यांचा आवडता विषय आहे व त्या अनुषंगाने पुण्याच्या वसंत व्याख्यान मालेत त्यांना गेली बारा वर्षे सन्मानाने निमंत्रित केले गेले आहे. पुणे, कोल्हापूर सोलापूर, औरंगाबाद, लातूर, नांदेड, सांगली, सातारा, नागपूर, जळगाव, अमरावती, अंबेजोगाई, संगमनेर, नाशिक इ. मोठाल्या शहरी त्यांची व्याख्याने ज्ञानसत्रे गाजलेली आहेत. नभोवाणीवर कै. पु. मं. लाड संस्मरणीय व्याख्यानमालेत त्यांनी १९७१ साली दोन व्याख्याने गुंफली होती तर १९६९ डिसेंबर ते ७० जानेवारी या काळात पुणे आकाशवाणीवर एकातासाचे एक अशी तीन भाषणे त्यांनी प्रसारित केली. इंदूरच्या ७५ सालच्या व औंदुबरच्या १९७४ च्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविलेले आहे.

स्वामी विवेकानंद हा त्यांचा आवडता व्यासंग विषय आहे. गेली ३० वर्षे याच एका विषयावर त्यांनी पारायणे केली आहेत. श्रीअरविंद महर्षिंचा त्यांचा अभ्यास दांडगा आहे. पाँडेचरी, कन्याकुमारी या ठिकाणी त्यांनी आपल्या आवडत्या विषयाशी समरस होण्यासाठी वास्तव्य केले होते. पौर्वात्य व पाश्चिमात्य तर्कशास्त्र व तत्वज्ञान या विषयांचेही त्यांचे सदोदित चिंतन चालू असते. फिरता फिरताही ते चिंतन करतात. त्यांचे निवासस्थान व कॉलेज यामध्ये सुमारे पाऊण मैलाचे अंतर आहे व हे अंतर ते दोन्ही वेळा पायी–पायीच कापतात आणि चालता चालता त्यांच्या स्मरण चिंतनाच्या शलाका विविध दिशेने उजळत जातात. याचाच परिणाम म्हणून की काय "मुक्तिगाथा महामानवाची" हा महर्षि अरविंद व त्यांचे तत्वज्ञान, हा त्यांचा ग्रंथ प्रकाशित झाला असून स्वामी विवेकानंदावर त्यांचे चरित्रलेखन चालू आहे. संतांमध्ये त्यांना समर्थ रामदासांचे अधिक आकर्षण आहे. शिवछत्रपती, संभाजी, डॉ. आंबेडकर, म. फुले, आगरकर यासारख्या समाजसुधारकांवरही त्यांची अधिकार वाणीने व्याख्याने होत असतात. ९ मे व २४ जून १९७९ रोजी मुंबई दूरदर्शनवर त्यांनी 'कर्मवीर' हा अनुबोधपट सादर केला त्याचे लेखन व निवेदन त्यांनीच केले होते. प्रा. शिवाजीराव भोसले यांची वाणी रसाळ असून व्याख्यान प्रवचनाद्वारे त्यांच्या निवेदन विषयाची ओजस्विता व ज्ञानाचा सखोलपणा याचा पुरेपूर प्रत्यय श्रोत्यांना येतो व ऐकताना ते अक्षरशः मंत्रमुग्ध होतात.

प्रा. भोसले यांची श्रीसाईनाथांवर गाढ श्रद्धा आहे. ईश्वरत्वाचा प्रत्यय घडविणारे एक मौलिक माध्यम, आर्तांचे दुःख निवारण व परमार्थिकांचे संरक्षण हे

बाबांचे कार्य होय. कर्मयोग्यांना धैर्य देणारी, ज्ञानयोगीयांना मार्गदर्शन करणारी आणि भक्ती योगीयांची सतत पाठराखण करणारी दिव्य शक्ति अद्‌भूत सामर्थ्य म्हणजे मायमाऊली साई होय अशी त्यांची भावना आहे, श्रद्धा आहे. शिरडी क्षेत्री अशा या थोर आध्यात्मवादी ज्ञानराज प्राचार्य भोसलेसाहेब यांचे संत श्रेष्ट साईबाबांवर ज्ञानपूर्ण प्रवचन ऐकण्याची सुसंधी साईभक्तांना यंदा लाभत आहे या बद्दल प्रा. शिवाजीराव भोसले यांचे अभिनंदन करून त्यांना भावी आयुष्यात अशाच प्रकारचे उज्ज्वल यश लाभो अशी शुभेच्छा श्रीसाईबाबा संस्थानतर्फे व्यक्त करतो.

☆ ☆ ☆

# — श्रीसाईनाम सप्ताह —

श्रीसाईबाबा संस्थान शिरडी कर्मचाऱ्यांतर्फे श्रीसाईनामसप्ताह लेंडीबाग नंदादीपाजवळ दि. १९–७–७९ ते २६–७–७९ पर्यंत करण्यात आला.

१) श्रीसाई सच्चरित ग्रंथ पारायण. २) अखंड वीणा पहारा.

३) दररोज रात्री १० ते पहाटे २ पर्यंत ठिकठिकाणचे भजनी मंडळाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. समाप्तिचे अगोदरचे दिवसा पासून पर्जन्यास सुरवात झाली हे विशेष.

शेवटच्या दिवशी पारायण समाप्ति झाल्यावर झुणका भाकर प्रसाद जवळ-जवळ १००० लोकाना वाटण्यात आला.

## ००० हस्त कला वस्तु प्रदर्शन ०००

जिल्हा औद्योगिक केंद्रामार्फत दि. १९ व २०–७–७९ रोजी समाधि मंदीरावरील हॉलमध्ये हस्तकला वस्तुप्रदर्शन भरविले होते. बऱ्याच भक्तांनी त्याचा लाभ घेतला.

# ००० तपोविभूति गणेशलालजी महाराज ०००

— श्री. क. ही. काकरे,
कोर्ट रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी

● तपोविभूति श्री. गणेशलालजी महाराज हे जैन धर्मीय महान संत होऊन गेले. ते कर्नाटक गजकेसरी गणेशलालजी महाराज म्हणून जास्त प्रसिद्ध आहेत. कर्नाटक प्रांत ही त्यांची कर्मभूमि म्हणून त्यांना कर्नाटक गजकेसरी म्हणतात. वास्तविक मूळचे ते राजस्थान मधील बिलाडा गावचे. तेथेच त्यांचा जन्म कार्तिक शुक्ल षष्ठी विक्रम संवत १९३६ साली झाला. त्यांची आई धूलीबाई आणि पिता पुनमचंदजी लालवानी होते. शोभाचंद्र हा त्यांचा एकमेव भाऊ त्यांच्यापेक्षा वयाने ५ वर्षे लहान होता.

श्री. गणेशलालजी महाराज आपल्या आईवडिलांची प्रथम संतती असल्यामुळे आणि त्यांचा आत्मा सर्व विघ्नांचा विनाश करणारा आणि पुण्यशाली असल्यामुळे त्याचे नाव गणेशलाल ठेवण्यात आले. त्यांनी १६ व्या वर्षात पदार्पण केले तेव्हा त्यांची आई वारली. आणि त्यांच्या २४ दिवसानी वडील वारले. म्हणून दोन्ही भाऊ उद्‌विग्न होऊन दक्षिणेत आले. काही काळा नंतर त्यांना बंधू वियोगही झाला.

श्री गणेशलालजी महाराजांचे गौरवर्ण, विस्तीर्ण भालप्रदेश, तेजस्वी नेत्र, काळ्या भुवया सुंदर लक्षणानीयुक्त हातपाय आणि आजानुबाहू हात त्यांचे भविष्य वर्तवीत होते की हा आत्मा निद्रिस्त जगाला जागा करणारा आहे. त्यांच्यावर सुसंस्कार घडविण्यात त्यांची आई फार दक्ष असे. आईच मुलांची प्रथम शिक्षक असते. त्यांचे आईवडील फार विवेकवान आणि गुणवान होते, आणि ते आपल्या मुलांना आपणाप्रमाणेच घडवू इच्छित होते. एकदा गणेशलालजींनी आपल्या शर्टाला खिसा लावून घेतला. त्यावर वडीलांनी गालावर चापट मारून विचारले 'तुला चोरी करायला शिकायचे आहे काय?'

गणेशलालजी लहानपणापासूनच फार स्वाभिमानी आणि त्यागी होते. कनक आणि कांताच्या मोहाने त्यांना कधी स्पर्श केला नाही. आईवडिलांचेच संस्कार त्यांच्यावर घडले होते. त्यांचे वय अवघे ६ वर्षांचे असताना जयपुरचे एक श्रीमंत शेठ त्यांना पुत्र म्हणून दत्तक घेण्याच्या इरादाने घेऊन गेले. तेथे एक दिवस त्यांचा स्वाभिमान उफाळून आला. त्या वयात देखील त्यांनी त्या गृहस्थांना

बजावले 'मला ह्या आयुष्यात दोन बाप करायचे नाहीत, मला इथे रहायचे नाही, मला माझ्या आईवडीलांकडे पाठवून द्या.' पुढेही असेच दोन प्रसंग आले. आई-वडील वारल्यानंतर, दक्षिणेत आल्यानंतर मनमाड येथील लक्षाधीश ललवानी शेठनी तसेच जामनेर येथील तितकेच श्रीमंत असलेल्या ललवाणी शेठनी त्यांना दत्तक घेण्याची त्यांच्याकडे इच्छा प्रगट केली होती. दोघानाही त्यांनी सांगितले 'मला ह्या आयुष्यात दोन बाप करायचे नाहीत.' कोणाचे आश्रीत होण्यापेक्षा स्वतःच्या पायावर उभे रहाणे त्याना जास्त पसंत होते. ते वेलापूर येथे एका सेठच्या दुकानी मुनीम झाले. एक दिवस सेठने त्यांना मुद्दती हुंडी लिहायला सांगितले. यावर गणेशलालजी तडकून म्हणाले 'तुमची दौत लेखणी तुम्ही सांभाळा.' मला असले खोटे धंदे करायचे नाहीत, आणि कुणावर अन्याय करायचे नाहीत.' असे सांगून आपला ३१ महिन्यांचा पगार न घेता ते निघून गेले. ते म्हणाले मी पगार घेतला असता तर मजूर ठरलो असतो. बरे झाले सेठनी मला पैसे न देऊन मजूर बनण्यापासून वाचविले.

संसारीक सुखाविषयी ते अनासक्त व उदासीन होते. नगरसोलचे खेमचंदजी बाफना यांनी आपल्या पुतणीचे लग्न गणेशलालजीशी करण्याची इच्छा व्यक्त केली. गणेशलालजींनी सांगितले की, मला लग्नाच्या फंदात पडायचे नाही.

त्यांच्या मनात वैराग्य जागृत झाले. एके रात्री त्यांच्या पोटात फार दुखायला लागले. त्यांना वाटले माझे आईवडील ४० वर्षांचे असताना वारले. माझेही ४० वर्षांचे वय व्हायला अवघी ५ वर्षे राहिली आहेत. मला आता सावधान झाले पाहिजे. आता वेळ घालवायला नको. माझी पोटदुखी थांबली तर भगवान श्रीमहावीरांनी अनुसरलेला मार्ग मी अनुसरीन असा त्यांनी निश्चय करताच त्यांची पोटदुखी थांबली. लगेच ते आपल्या १० हजार रूपयांचा माल भरलेल्या दुकानाला लाथ मारून गुरुच्या शोधात निघाले. त्यावेळी बेलापूर येथे घोर तपस्वी श्री. रोडमलजी महाराजांचे सुशिष्य घोर तपस्वी श्री. प्रेमराजजी महाराजांचा चातुर्मास चालू होता. त्यांनी त्यावेळी केवळ पाणी घेऊन ६६ दिवस पर्यंत उपवास केले होते. श्री गणेशलालजींनी त्यांना भगवती दीक्षा देऊन आपला शिष्य करून घेण्यास विनविले. प्रेमराजजी महाराजांनी त्यांना दीक्षा घेतल्यानंतर मुनी जीवन जगणे किती खडतर असते हे समजावून सांगून त्यांच्या वैराग्याची चाचणी घेतली पण गणेशलालजी महाराज वैराग्याने पूर्ण रंगून गेले होते. ते भिवून जाणारे थोडेच होते ! तरीपण त्यांना तावडतोब दीक्षा दिली नाही. पुढे विहार करीत प्रेमलालजी महाराजांसोबत ते नगरसोलला आले. तेथे त्यांना

साधुपणाचे भगवती दीक्षा वि. सं. १९७० मध्ये मार्गशिर्ष शु. ९ रोजी (इ. स. १९१४) देण्यात आली. दीक्षा समारंभाचा खर्चाचा सर्व भार नगरसोलच्या खेमचंदजी ब्राफनांनीच उचलला.

आता गणेशलाल श्री गणेशलालजी महाराज झाले. मुनी झाले. नवदिक्षित मुनींनी तावडतोब आपल्या रसेंद्रीयाला वश केले. हरीभद्र सुरीने भिक्षूची व्याख्या करताना म्हटले आहे 'क्षुधा भिन्नतीति भिक्षु' म्हणजे जो रसनेवर ताबा मिळवितो तो खरा भिक्षु. कित्येक लोक रसनेच्या आहारी जाऊन आपले जे लक्ष संयम आहे त्यालाच विसरून जातात. त्यांनी सुरुवातीला दररोज एकच वेळ जेवण घेण्याचा नियम केला. त्या जेवणाशिवाय त्या दिवशी दुसरे काहीं खाद्य किंवा पेय घेत नसत. ते जे जेवण भिक्षा मागून आणीत त्यातील सर्व वस्तू एकत्रित करून ते खात असत. हा उपक्रम त्यांनी १० वर्षपर्यंत केला. त्यानंतर त्यांनी विशेष आत्मशुद्धीसाठी एक दिवस पूर्ण निर्जळी उपवास व दुसरे दिवशी जेवण अशी एक दिवसआड तपश्चर्या करून मरेपर्यंत पाळली. त्यात खंड कधी पडला नाही. त्यांना माहित होते की इंद्रियें वश केल्याशिवाय ज्ञानाची प्राप्ती होत नाही.

आणि ज्ञानाशिवाय तपसंयम इत्यादि अंधक्रिया होत. म्हणून त्यांनी तपाबरो-बरच धर्म ग्रंथाचे अध्ययन केले. त्यांचे सूत्र होते 'प्रथम घोका, मग त्यावर चिंतन करा. मग त्यात काही शंका उद्भवल्या तर विचारून त्याचे निरसन करा. आणि नंतर लिहा.' अशा रितीने त्यांनी जैन धर्माचे ४५ आगम ग्रंथ स्वहस्ते लिहून काढले. ते आगम त्यांनी इतके शुद्ध आणि सुंदर हस्ताक्षरात लिहून काढले की पहा-तच राहावे. श्री गणेशलालजी महाराज नेहमी स्वाध्याय करीत. दिवसा कधीही झोपत नसत. एक क्षण देखील वाया घालवत नसत.

तपश्चर्येने त्यांची आत्मशक्ती वाढली. वाचन चिंतन आणि लेखन यानी त्यांचे ज्ञान वाढले. त्यानंतरच त्यांनी लोकांना उपदेश करण्यास सुरूवात केली. ते श्रीमंत गरीब, जैन-अजैन सर्वांना समान उपदेश करीत. त्यांचे सर्व उपदेश नेहमी शास्त्रीय तत्वाने भरलेले असत. त्यांचे प्रवचन सैद्धांतिक असे. त्यांची वाणी ओजस्वी होती. जेव्हा ते चढया आवाजात बोलत तेव्हा सर्व श्रोत्यांचा थरकाप होई. त्यांचा शब्द कोणी अव्हेरू शकत नव्हता. ते स्पष्टवक्ता होते. कोणाची भीडभाड ठेवीत नसत त्यांच्या वाणीत स्वाभाविक विनोद भरलेला होता.

श्री गणेशलालजी महाराजांचे संस्कृत, प्राकृत, मराठी, गुजराती, राजस्थानी आणि कानडी भाषांवर प्रभुत्व होते. या भाषांमध्ये ते व्याख्याने देत. ते कर्नाटक

प्रांतात गेले. तेथील लोकांना जैन साधु काय असतो ते माहीत नव्हते. त्यांना भिक्षा देणे तर दूरच राहीले, त्यांच्याशी कोणी धड बोलायला तयार नव्हता. परंतु त्यांनी परिश्रमपूर्वक असा धर्म प्रसार केला की, त्यामुळे दृढधर्मी, धर्मप्रीय, व्रतधारी, ज्ञानी आणि ध्यानी असे श्रावक बनले. जनतेला मांस आणि मदिरेचा त्याग करायला प्रवृत्त केले, आणि दानवातून माणूस बनविले. म्हणून त्यांना लोक कर्नाटक गजकेसरी म्हणत.

संत चमत्काराकरिता चमत्कार करीत नसतात. त्यांच्याने चमत्कार सहजच घडतात. तपश्चर्येमुळे त्यांच्या अंगी आत्मीक शक्ती वाढली. त्यांच्या वाचेला सिद्धी प्राप्त झाली. ते जे बोलत त्या प्रमाणे घडून येई. त्यामुळे जैन आणि अजैन सर्वांचीच त्यांच्यावर दृढ श्रद्धा बसली. ते जालना येथे आले. तेव्हा तेथे प्लेगच्या साथीने हाहाःकार उडवून दिला होता. त्यांनी लोकाना सांगितले शांतिनाथ भगवानाच्या नामजपाचा सप्ताह करा. शांतिनाथ भगवान सर्व रोगराई विनाशक आहे. शहरात त्या प्रमाणे जप आणि उपवास आदि तप सुरू झाले, आणि प्लेगाची साथ नाहीशी झाली. ह्या चमत्कारामुळे त्यांची कीर्ति चोहीकडे पसरली. ते जेथे जेथे जात तेथे तेथे लोकांना शांतिनाथ भगवान नामजप सप्ताह करायला सांगत. नामजपामुळे जागोजागी शांति पसरली.

श्री गणेशलालजी महाराज शाहागडला आले होते. त्यांना उतरण्याकरिता जी जागा दिली होती. तेथे ते स्वाध्याय करीत असताना एक मोठा भुजंग येऊन त्यांच्या पासून १ हात अंतरावर फणा उभारून बसला होता. लोक घाबरले. महाराजांना त्यांनी तेथून दुसऱ्या सुरक्षित जागेत चलण्यास विनविले. त्याला महाराजांनी नकार दिला. ते म्हणाले की, "भगवान महावीरांच्या समवशरण मध्ये सिंह, साप, मुंगूस, हत्ती, आणि इतर सर्व प्रकारचे प्राणी आपआपसातील वैर विसरून येऊन बसत, आणि भगवानांच्या पुण्यवाणीचा लाभ घेत असत. माझ्या मनात सापाविषयी वैर नसल्यामुळे साप माझे काही बिघडवू शकणार नाही. साप तर माझ्याकडे आला आहे. त्याला वीरवाणीपासून वंचीत का करू ?" साप तेथे १० वाजल्यापासून ४ वाजेपर्यंत ६ तास बसून राहिला. शेवटी महाराज त्याला म्हणाले तू आपल्या ठिकाणी जा नाहीतर तुला कुणी मारून टाकील. एवढे म्हणण्याचा अवकाश, साप तेथून निघून गेला. सापाचे विष महाभयंकर असते. त्यापुढे कित्येक मंत्रविधी, तंत्र-विधी, डॉक्टर, वैद्य, हात टेकतात. पण गणेशलालजी महाराजांच्या केवळ दृष्टीक्षेपाने सापाचे विष उतरत असे. वैजापूरजवळ खंडाळा नावाच्या खेड्यात एका धोब्याच्या मुलाला साप चावला होता. त्याला महाराजांकडे आणून महाराजांना त्याला साप

चावला असल्याचे सांगितले. महाराज उद्गारले काय म्हणता याला साप चावला आहे ? याला शांति सप्ताहात उभा करा. त्याप्रमाणे मुलाला जपाकरिता उभे करण्यात आले. सापाच्या विषाचा त्याच्यावर काहीही परिणाम झाला नाही.

परळी वैजनाथ येथील भगवानदासजी तोतला यांची बुंदरगाव येथे शेती आहे. ते शेतीच्या देखरेखीकरिता तेथे गेले असता चोरांच्या टोळीने रात्रीच्या वेळी त्यांचे घड्याळ व पैसे लुटले. नंतर चोरांनी विचार केला ह्याने आपल्याला ओळखले असणार, हा जीवंत राहिला तर आपणाला घातक ठरेल. तेव्हा याला जाळून टाका. त्यांनी त्याच्या अंगावर घासलेट शिडकावले. भगवानदासजी जैन धर्मिय नसले तरी त्यांची गुरुदेव श्री गणेशलालजी महाराजांवर असीम श्रद्धा व भक्ती होती. त्यांनी गुरुदेवांचा धावा केला. चोर त्यांच्या अंगाला पेटवून देणार इतक्यात त्यांचा विचार बदलला. त्यांनी त्याला सोडून दिले. चोरासंबंधी आणखी एक घडलेला चमत्कार हा फार महत्वाचा व आश्चर्यकारक आहे. बंगलोर येथील अनराजजी साकला हे फार धर्मप्रेमी आणि श्री गणेशलालजी महाराजांचे अनन्य भक्त आहेत. त्यांची मुलगी सुरजबाई गोलछा ही देखील महाराजांची अनन्य भक्त आहे. ती लग्न होऊन प्रथमच सासरी गेली. तेव्हा तिच्या अंगावर सोन्याचे व रत्नांचे दागिने होते. दुपारी ४ वाजता त्यांच्या घरी डाका पडला. घरचे सर्व लोक भीतिपोटी थरथर कापायला लागले. परंतु ह्या नवपरिणीता मुलींने आपल्या अंगावरील सर्व दागीने उतरून एका थाळीत ठेवले आणि त्यावर एक मळकट कापडाचा तुकडा टाकला, आणि सद्गुरूनाथ गणेशलालजी महाराजांचा सारखा धावा करण्यास सुरूवात केली.

आश्चर्य असे की, चोरांनी सर्व घर धुंडाळले पण त्यांना काहीही मौल्यवान वस्तू मिळाली नाही. त्यांनी सुरजबाईला विचारले या थाळीत काय आहे ? तिने सांगितले मुलांची खेळणी आहेत. चोरांनी थाळी उघडून पाहिली त्यात त्याना दागिने दिसले नाहीत. लाखो रुपयांचे दागिने समोर पडले होते पण चोरांची दृष्टी गेली होती. महाराजांचे असे अनेक चमत्कार सांगता येतील.

महाराजांनी त्यांच्या भक्तगणांवर अनन्य उपकार केले आहेत. त्यांच्याकडे मंत्र तंत्र काही नव्हते. पण त्यांच्या तपोबलापुढे भूत पिशाच्च, भानामती इ. मुळीच ठरत नसत. भूत पिशाच्च भानामती यानी पीडित व्यक्ति त्यांच्यापुढे आल्या तर महाराजा जवळ "लाख दुःखोंकी एकही दवा" म्हणजे तपश्चर्या हे एकच औषध होते. ते कुणाला ११ दिवस, कुणाला १५ दिवस तर कुणाला २१ दिवस उपवास करायला लावीत. उपवास फार कडक. या उपवासात उकळून ठेवलेल्या पाण्याशिवाय

खाद्य किंवा पेय वस्तू तोंडात घालावयाचे नसते. भुकेने व्याकुळ होऊन भूत पिशाच्च 'जातो' असे सांगून ते निघून पळून जात होते.

महाराजांच्या तपोबलाने कित्येक कुष्ठरोगी व वेडी माणसे चांगली झाली. त्यांच्या करिताही रामबाण उपाय म्हणजे उपवास.

महाराजांची गोमातेवर फार भक्ती. त्यांनी आपल्या भक्तांमार्फत खाटीकांकडून कित्येक गाई सोडवून आणल्या. चौसाळा, औरंगाबाद, जालना आणि कर्नाटकातील गौशाळा स्थापन केल्या. ते खादीवाले महाराज म्हणून जास्त प्रसिद्ध आहेत. ते स्वतः तर संपूर्ण खादीच वापरीत पण त्यांच्या भक्तांनासुद्धा खादी वापरायचा उपदेश व आग्रह करीत. त्यांच्या अनुयायांनी त्यांच्याकडे आणलेल्या खादीचे ते मोफत वितरण करीत. खादी घेणारानी मोबदल्यात महाराज सांगतील तितक्या दिवसांच्या उपवासाची तपश्चर्या करावयाची किवा महाराज सांगतील त्या प्रकारची धर्मकार्ये करायची. ते खादी न वापरणाराशी समोरासमोर संभाषण करीत नसत.

मुंहपती (मुखवस्त्रिका) तोंडावर बांधल्या शिवाय त्यांच्याकडे प्रवेश नसे. त्यांचे म्हणणे असे की, मुखवस्त्रिका ही जैन धर्मस्थानीं वापरण्याचा गणवेष आहे आणि तो वापरलाच पाहिजे. त्यामुळे तुम्ही जैन आहात हे ओळखता येते. वकील कोर्टात काम करताना गळयाला शेळीचे कान लावल्याप्रमाणे पांढरी कापडी ब्यांड पट्टी बांधतात. तसेच अंगावर काळा गाऊन घालतात. त्यामुळे सौंदर्यात भर पडते असे नाही. हे करताना त्यांना जशी लाज वाटत नाही तशी धर्मस्थांनी मुखवस्त्रिका लावताना तुम्हाला लाज का वाटावी. ?

श्रीगणेशलालजी महाराजांनी सम्यकत्व पालन आणि मिथयात्व त्याग याचा हिरीरीने प्रचार केला. सम्यकत्व आणि मिथयात्व ही परस्पर विरोधी तत्वे आहेत. ही दोन्ही तत्वे सर्वसामान्य माणसाला समजायला अवघड आहेत. साम्यकत्व म्हणजे काय हे समजण्याकरिता मिथयात्व म्हणजे काय हे समजणे अत्यावश्यक आहे. योगशास्त्रात म्हटले आहे "अनित्याशुचिदुःखात्मसु नित्यशुचिसुखातात्मख्यातिर-विद्या" म्हणजेच अनित्याला नित्य, अशुद्धाला शुद्ध, दुःखाला सुख आणि आत्म्याला अनात्मा मानणे, मिथयात्व आहे. त्याच्या उलट कोणत्याही वस्तूचा किंवा गोष्टीचा सर्वांगीण विचार करणे, नित्याला नित्य, अनित्याला अनित्य, शुद्धाला शुद्ध, आत्म्याला आत्मा मानणे म्हणजेच वस्तू जशी आहे तशी मानणे त्यापेक्षा विपरीत न मानणे यालाच साम्यकत्व म्हणतात. कुदेवाला म्हणजे (असे देव जे

मोक्षाला नेऊ शकत नाही ) त्यांना देव वा गुरु मानून त्यांची पूजा करणे मिथयात्व आहे.

श्रीगणेशलालजी महाराज जैन धर्माची मूळ तत्वे अहिंसा, सत्य, अस्त्येय, ब्रह्मचर्य, असंग्रह, यांचीही आपल्या भाषणांद्वारा शिकवण देत.

ते धर्म नियमांचे फार काटेकोर रितीने पालन करीत. नियमाप्रमाणे चातुर्मासा-खेरीज करून एक महिन्यापेक्षा जास्त काळ कुठेही राहिले नाहीत. मुनी दीक्षा घेतल्यापासून नेहमी पदयात्रा करीत. ते बालब्रम्हचारी होते. कनक, कामिनी, व वाहन इत्यादि त्यांना वर्ज्य होते. १८ वारापेक्षा जास्त कापड स्वतःच्या वापराकरिता ठेवीत नसत. भिक्षा केवळ अन्न पदार्थांची आणि तीही एकवेळ लागेल इतक्याच प्रमाणावी घेत.

अशा ह्या, तपस्वी जनकल्याणकारी महान परोपकारी, संत महात्मा श्रीगणेश-लालजी महाराजांनी जालना येथील गौशाळेत रविवार दिनांक ४ फेब्रुवारी १९६२ रोजी आपल्या ह्या नश्वर देहाचा त्याग केला. अशा या संतमहात्म्यास शतशः प्रणाम.

★ ★ ★

दुसरा दिवाळीची विलक्षण भेट

**"मशिदीत प्रगटला परमेश्वर !"**

वाचायला सुरुवात केल्यानंतर पुरी ४१८ पाने वाचून होईपर्यंत हातातून न सुटणारी व शेवटचे पान वाचताच पुन्हा पुन्हा वाचण्याचा संकल्प सोडावयास लावणारी साईबाबांच्या जीवनावरील एकमेव प्रासादिक कादंबरी ! ३६ रु. किंमतीची, सवलतीत ३० रुपयात उपलब्ध ! ट. खर्च ४ रुपये. व्ही. पी. नाही.

**प्रशान्ति प्रकाशन** : ९/१३, पिरामल नगर, गोरेगांव (प.) मुंबई ६२.
केशव भिकाजी ढवळे, बॉम्बे बुक डेपो, गिरगांव, मुंबई ४.
रसिक साहित्य, पुणे ३०.

**प्रत्येक साईभक्तानं अभिमानपूर्वक संग्रही ठेवण्याजोगा ग्रंथ !**

श्रीसाईमूर्तीचा रौप्यमहोत्सव

# शिरडी समाधीमंदिरातील श्रीबाबांची मूर्ती

—सदानंद चेंदवणकर,
कार्यकारी संपादक श्रीसाईलीला,
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी.



एकसष्टावी असे आज तुझी हे दीनदयाळा कृपाळा ।
रौप्य महोत्सवी ही तव मनोहर मूर्ती सुंदर खासे नेत्राला ॥

● शिरडीच्या विश्वविख्यात समाधीमंदिरातील श्रीसाईबाबांच्या नयन मनोहर मूर्तीला प्रतिष्ठापित केल्याला यंदाच्या विजयदशमीला बरोबर पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत हे वृत्त ऐकूण कुणालाही आनंदच वाटेल, साईभक्तांना तर या मूर्तीसमोरून आता हलूच नये असे होऊन जाईल यात शंका नाही.

शिरडी समाधीमंदिरातील श्रीसाईनाथांची नेत्ररम्य मूर्ती संपूर्णपणे इटालीयन मार्बलची आहे. हा इटालीयन मार्बल 'कराका मार्बल' या नावाने ओळखला जातो. इटलीमधे कराका या शहरी या जातीच्या संगमरवराच्या खाणीच्या खाणी आहेत. हा कराका मार्बल 'ए' ग्रेडचा संगमरवर म्हणून जगभर प्रसिद्ध आहे.

शिरडीची श्रीबाबांची मूर्ती साडेपाच फूट उंच आहे, व ती सव्वातीन फूट लांब व अडीच फूट रुंद अशा चौथऱ्यावर अधिष्टीत आहे. या मूर्तीला त्यावेळी तयार करण्यास २२ हजार रु. खर्च आला. आज तशीच मूर्ती तयार करण्यास ६५ हजार रु. खर्च येतो.: पण मूर्तीला कराका मार्बल तयार करण्यासाठी मिळणार नाही. कारण हा विशिष्ट जातीचा संगमरवर परदेशाहून आयात करावा लागतो व सरकारने परकीय चलनाच्या नावाखाली हा मार्बल भारतात आणण्याचे परवाने देणे अजिबात बंद केले आहेत.

श्रीबाबांच्या शिरडीच्या मूर्तीचे शिल्पकार आहेत. कै. बाळाजी वसंत तालीम भाऊसाहेब म्हणून ते शिल्प जगतात ओळखले जात. ही मूर्ती तयार करण्यास त्यांना तब्बल सात महिन्यांचा अवधी लागला भल्या पहाटे उठून ते दररोज मूर्तीचे काम करीत असत त्यापायी त्यांनी अपरंपार कष्ट घेऊन बाबांचा हुबेहूबपणा मूर्तीत आणण्याचा शंभर टक्के यशस्वी यत्न केला आहे आणि आश्चर्याची गोष्ट ही की श्रीसाईनाथांनी या कार्यासाठी खूष होऊन की काय साक्षात् एका भल्या पहाटे त्यांच्या गिरगावातील कॉंग्रेस हाऊस जवळील स्टुडिओत त्यांना दर्शन देऊन तृप्त केले आहे.

निश्चित दिवस व तारीख सांगायची झाली तर गुरुवार दिनांक ७ ऑक्टोबर १९५४ रोजी शिरडीच्या समाधी मंदिरात श्रीबाबांची ही मूर्ती सन्मानपूर्वक प्रतिष्टापीत करण्यात आली. त्यापूर्वी एका मालवाहू मोटारमधून दिनांक २ अक्टोबर ५४ रोजी ती मुंबईहून शिरडीस नेण्यात आली. ती मोटार शिरडी खंडोबाच्या देवळापाशी पोचल्यावर तेथून मिरवणूकीने व घोषवादनाच्या निनादात ती मूर्ती समाधी मंदिरात

समाधीच्या शेजारी नेऊन ठेवण्यात आली. मूर्ती नव्हती तेव्हा समाधी मंदिरात बाबांची एक तसबीरच काय ती होती. ही तसबीर आता वस्तूसंग्रहालयात आहे.

श्रीबाबांच्या या पूर्णाकृती प्रतिमेची षोडषोपकारे प्राण प्रतिष्ठा करण्यासाठी होणाऱ्या भव्य समारंभासाठी श्रीसाईसेवेत मग्न असलेल्या कित्येक भक्तांना तत्कालीन व्यवस्थापक समितीतर्फे निमंत्रणे पाठविण्यात आली होती. मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेसमयी विष्णुयाग व्हावा व त्यावेळी पवमान पंचसूक्ताचे, तिळाचे मुख्यत्वे; हवन व्हावे असे ठरविण्यात आले. पवमानाच्या ४८ आवृत्या म्हणजेच २ लघु विष्णू करावयाचे ठरविण्यात आले होते व त्यासाठी मुंबई व ठाणे येथून १२ वेदशास्त्र संपन्न




डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर

ब्राह्मण हजर होते व प्राणप्रतिष्ठेची धार्मिक बाजू समितीने डॉ. केशव भगवंत उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर यांचेकडे सोपविली होती. आचार्य म्हणून कुल्र्याच्या सर्वेश्वर मंदिराचे पुजारी वे. शा. सं. माधवराव जोशी व ब्रम्हा म्हणून वे. शा. सं. भालचंद्र श्रीपाद कानिटकर यांची योजना केली होती. त्या उभयतांना सहाय्यक म्हणून ठाण्याचे वे. शा. सं. तात्या जोशी, विनायक आठल्ये, नारायण जोगळेकर, गजानन केळकर व मुंबापुरीचे आणखीन सहा ब्राम्हण हजर होते. हवन कार्यक्रमाचे पुण्याहवाचन डॉ. गव्हाणकर व त्यांच्या पत्नी सौ. सुशिलाबाई उर्फ ताई गव्हाणकर यांनी केले.

गुरुवार आश्विन शुद्ध दशमी-विजयादशमी या दिनी श्रींची काकड आरती नेहमीप्रमाणे झाली. समाधीला स्नान घालण्यात आले. सकाळी साडेसात वाजता या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेचे पुण्याहवाचन श्री. बाबांच्या बाळाचे बाळ ऊर्फ ॲडव्होकेट श्रीपाद बाळकृष्ण देव व सौ. नलिनीबाई यांनी केले. नंतर मूर्तीला मुद्दाम आणलेल्या गंगोदकाने मंगलस्नान घालण्यात आले. लघुरुद्रनंतर या परमपवित्र श्रीसाई मूर्तीचा अनावरण समारंभ ख्यातनाम साईभक्त व अहमदाबाद निवासी श्रीसाईशरणानंद (पूर्वाश्रमीचे श्री. वामनभाई पटेल बी. ए. एल. बी. ॲडव्होकेट) यांचे शुभहस्ते झाला. आजही श्रीसाईशरणानंद हयात असून त्यांचे वय ९० वर्षांचे आहे. याचवेळी पुण्याचे प्राध्यापक श्री. अनंतराव आठवले साकुरीच्या प. पू. गोदावरी माताजी,



कै. वसंतराव गोरक्षकर



कै. नागेशराव सावंत

नगरचे श्री. सहजानंद भारती, मूर्तीचे शिल्पकार श्री. भाऊसाहेब तालीम, शिरडीचे श्री. बाजीराव पाटील, श्री. बाबासाहेब कीर्तीकर, श्री. आबासाहेब भट, संस्थानचे त्यावेळचे इंजिनियर श्री. अण्णासाहेब नगरकर, पूर्वीचे व्यवस्थापक विश्वस्त श्री. वसंतराव गोरक्षकर, श्रीसाईलीला संपादक श्री. नागेशराव सावंत व श्री. नानासाहेब राणे इ० मंडळी हजर होती या प्रसंगीचे नंदादीप पिक्चर्स तर्फे श्री. पांडुरंग दीक्षित कुमारसेन समर्थ व कै. मामा साठे यांनी चित्रिकरण केले होते. बहुतेक सर्व मंडळींचा यथोचित सत्कार करण्यात आला. श्री. अनंतराव आठवले यांचे या मूर्तीस्थापनेच्या निमित्याने कीर्तन झाले. श्रीएकनाथ महाराजांना त्यांचे गुरुजी श्रीजनार्दनस्वामी यांनी दत्तदर्शन घडविले ह्या त्यांच्या कीर्तनाख्यानाचा विषय होता. दि. ७-१०-५४ पासून आजतागायत ही श्रीमूर्ती भक्तांना दर्शन देत आहे.

— ● —

# शिरडीचे श्री साईबाबा
# आणि
# साकुरीचे श्री उपासनीबाबा

—डॉ. शां. ना. टिपणीस,
एम्. ए. पी. एच. डी.
श्री उपासनी कन्याकुमारी आश्रम,
साकुरी, जि. नगर

● डॉ. इरावती कर्वे या महाराष्ट्रातील प्रसिद्ध विदुषीने 'महाराष्ट्र, मुलुख आणि संस्कृति' या नावाचा एक अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिला आहे. त्यामध्ये 'महाराष्ट्र दैवत आणि साधुसंत' यांच्याविषयी उल्लेख करताना शिरडीचे श्रीसाईबाबा आणि साकुरीचे श्री उपासनीबाबा यांचा आदरपूर्वक उल्लेख केला आहे. शिरडीचे नाव माहीत नाही असा माणूस सध्या सापडणार नाही. एकेकाळी शिरडीचे नाव फारसे लोकांना ठाऊकही नव्हते. परंतु साईबाबांसारख्या अवतारिक पुरुषाने तेथे वास्तव्य केले, आणि शिरडीस महत्त्व प्राप्त झाले. आता तर साईबाबांचे नाव अबालवृद्धांपर्यंत सर्वतोमुखी झाले असून घरा-घरातून त्यांची पूजा होते. साईबाबांचा कीर्तिपरिमल परदेशातहि पसरला असून युरोप व अमेरिकेसारख्या देशामधून त्यांची मंदिरे उभारण्यात आली आहेत.

साईबाबा म्हणजे वाहती गंगा होती. कुणीहि यावे अन् त्यांच्या दर्शनानी पावन व्हावे, साईबाबांच्या हयातीतहि असंख्य लोक त्यांच्याकडे ओढले गेले. आपल्या दुःखाची निवृत्ति व्हावी म्हणून अनेक माणसे शिरडीची वाट धुंडाळीत असत. ऐहिक सुखाबरोबर पारलौकीक कल्याण व्हावे, म्हणूनहि काही लोक साईबाबांकडे येत, साईबाबा सर्वांनाच भक्तिमार्गाला लावीत असत. परंतु आत्मोन्नतीची तळमळ लागलेल्या मुमुक्षूंची संख्या विरळाच होती.

रामकृष्ण परमहंस नेहमी म्हणत, "सत्पुरुष गंगेसारखे आहेत. पाण्याचा लाभ होण्यासाठी कुणी तांब्या, तर कुणी कळशी, कुणी मोठाले पातेले, तर कुणी हंडा घेऊन जातो गंगेवर. ज्याचे पात्र जेवढे मोठे असेल, त्या मानाने त्याला लाभ होतो, तसेच संतांकडे जाणारे अनेक लोक असतात. परंतु ज्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणे प्रत्येकजण लाभ उठवतो."

या दृष्टान्ताप्रमाणे साईबाबांकडे अनेक तऱ्हेचे विविध क्षेत्रातील लोक आले. व त्यांनी आपले कल्याण साधले. त्याच सुमारास श्रीउपासनीमहाराजहि आले. आणि साईबाबांच्या कृपेने त्यांनी सिद्धावस्था प्राप्त करून घेतली.

श्रीउपासनी महाराज मूळचे नाशिक जिल्ह्यातील सटाण्याचे. १८७० साली मे महिन्याच्या १५ तारखेस उपासनी कुटुंबात ते जन्मास आले. बालपणापासून भगवत् प्राप्तीचे वेड डोक्यात असल्याने त्यांनी तपश्चर्येची वाट चोखाळली. सद्‌गुरुंच्या शोधार्थ हिण्डत असता शिरडीस साईबाबांची भेट पडली. साईबाबांच्याच कृपेने अद्वैतावस्था त्यांच्या अंगी पूर्ण बाणली. साईबाबांच्या आज्ञेवरून शिरडीस चार वर्षे त्यांनी वास्तव्य केले. तेथील खंडोबाचे मंदिर ही त्यांची तपोभूमी. शिरडीच्या वास्तव्यात त्यांना अनेक संकटाना आणि आपत्तींना तोंड द्यावे लागले. सुवर्ण अग्नि-मधून निघाल्यावरच त्याला तेज चढते.

साईबाबा एके प्रसंगी उपासनी महाराजाना उद्देशून म्हणाले, “अरे, तुझ्या वाडवडिलांचा आणि आमचा शेकडो वर्षांचा ऋणानुबंध आहे.”

श्रीसाईबाबांची कृपा संपादन केल्यावर श्री उपासनी महाराजांनी शिरडी सोडली. अनेक ठिकाणी भ्रमंती केल्यावर ते साकुरीस आले, व तेथेच त्यांचे पाय कायमचे विसावले. महाराजांच्या अंगावर फक्त गोणपाट होते. ग्रामस्थ लोकांनी त्यांना राहावयास पाचराची एक झोपडी बांधून दिली. दर्शनार्थ येणाऱ्या जनतेसाठी धर्म-शाळा बांधल्या गेल्या व उपासनेसाठी मंदिराची उभारणी झाली. महाराजांच्या वास्तव्यामुळे साकुरीस तीर्थाचे महत्व प्राप्त झाले.

शिरडीचे साईबाबा आणि साकुरीचे उपासनीबाबा यांचे अंतरीचे नाते आत्मीय तेचे होते. म्हणूनच अखिलभारतीय साई-समाजाचे संस्थापक श्री. बी. व्हीं. नर-सिंहस्वामी यांनी आपल्या ग्रंथामधून लिहून ठेवले की, “साईबाबांची कीर्ति भारतातच काय, किंबहुना भारताबाहेर जी पसरली, त्याचे मुख्य श्रेय श्री उपासनी महाराजांनाच आहे.”

श्रीसाईबाबांकडून प्राप्त झालेला दैवी गुणांचा पारमार्थिक वारसा श्री उपासनी महाराजांनी जतन केला, आणि तोच वारसा पुढे त्यांच्या परमशिष्या श्री गोदावरी माताजी यांनी चालविला आहे. श्री उपासनी महाराजांनी सुरू केलेल्या भक्तीच्या चळवळीत श्री गोदावरीमाताजींनी नवीन प्राण ओतले, व तिला मोठीच चालना दिली. साकुरीच्या पावन भूमीतून उगम पावलेली भक्तीची गंगा आता दुथडी वाहात असून साऱ्या विश्वास ती पावन करीत आहे. या भक्तीच्या चळवळीस आद्य प्रेरणा साईबाबांची होती, हे सत्य मात्र कुणाहि इतिहासकारास नजरेआड करता येणार नाही.

# वंदितो श्री साईनाथा

—श्री. बाबुराव अर्नाळकर
अभ्यंकर बिल्डिंग ग्रँटरोड, मुं. ७



● तो महिना कोणता होता, तारीख कोणती आणि वार कोणता हे सांगणं शक्य नाही. कारण ती आठवण विस्मृतीच्या अंधारात केव्हाच अदृष्य झाली आहे शिवाय ७४ वर्षाच्या दृष्टिहीन वृद्धाने किती आठवणी हृदयात साठवून जतन करायच्या हा ही एक प्रश्न आहे. एवढे मात्र खरे की या ठिकाणी साईभक्तांना जे सांगायचे आहे ते शंभर टक्के सत्य आहे आणि ज्या घटने बद्दल मी सांगणार आहे ती श्रीसाईनाथांच्या महानिर्वाणाच्या सहा सात वर्षापूर्वी आणि माझ्या बाल्यावस्थेच्या अगदी प्रारंभाच्या काळात घडलेली आहे त्या वरून अंदाज करणे शक्य आहे की त्यावेळी १९११ किंवा १९१२ हे वर्ष असावे.

त्या काळात वसई, अर्नाळा, विरार, पालघर, डहाणू पर्यंतच्या परिसरात कित्येक साईभक्त राहात होते. ते सर्व सुशिक्षित आणि पांढरपेशा वर्गातील होते. आणि ते आपल्या सवडी प्रमाणे किंवा अंतरीची ओढ लागल्यानंतर श्रीसाईदर्शनासाठी शिर्डीकडे धाव घेत होते. साईबाबांचे 'हेमाडपंत' श्रीसाईसत्चरित्राचे लेखक श्री. दाभोळकर हे याच परिसरातील, साईचरित्रात ज्यांचा अनेकदा उल्लेख करण्यात येतो ते देव मामलेदार यांचेही कार्यक्षेत्र हेच त्यामुळे या परिसरातील अनेक सुशिक्षिताना साईबाबाबद्दल माहिती मिळाली होती यामुळेच त्यांना साईदर्शनाचा ध्यास किंवा ओढ लागली होती असे म्हटल्यास ते चुकीचे ठरणार नाही.

साई दर्शनासाठी नियमितपणे जाणाऱ्या भक्तातील 'भाऊ' हे एक होते. घरातील, नात्यातील आणि अति परिचयातील मंडळी त्यांना भाऊ म्हणत असत. तर इतर त्यांच्या पेशावरून त्यांना वकील साहेब असे म्हणत असत.

मी वर नमूद केलेल्या काळात भाऊ साईदर्शनासाठी शिर्डीला जात या खेपेला भाऊ मनातून बरेच अस्वस्थ होते त्यांना त्यावेळी स्वतःच्या सांपत्तिक स्थितीची

चिंता वाटत होती. भाऊ या खेपेला शिर्डीला गेले त्यावेळी आपल्या त्या चिंतेचे आपल्या गुरूमाऊलीने निवारण करावे अशी त्यांची इच्छा होती आणि श्रीसाई-माऊलीच्या कृपेने आपल्या त्या चिंतेचे निवारण होईलच अशी त्यांची खात्री होती.

श्री शिर्डीचे साईनाथ हे परमेश्वराचे प्रेषित, नव्हे प्रत्यक्ष परमेश्वरच होते. अशी भाऊंची धारणा होती. त्यामुळे भाऊंनी शिर्डीला जाण्यासाठी वसई सोडताना असा संकल्प केला होता की, या खेपेला आपण आपल्या आराध्य दैवताचे पाय धरून आपल्याला संकट मुक्त करण्यासाठी गळ घालायची. देवाला गळ घालण्याचा अधिकार जर भक्ताला नाही तर तो कुणाला असणार? अशाप्रकारे भाऊ या खेपेला मनाची पूर्ण तयारी करून श्रीसाईबाबांना कोणत्या शब्दात आणि काय सांगायचं ते पक्क करून आनंदाने आणि उमेदीने साई दर्शनासाठी गेले.

भाऊ आणि इतर भक्तमंडळी जात होती त्या काळातील शिर्डी आणि आजची शिर्डी यात जमीन-अस्मानाच अंतर होतं. त्याहीवेळी आजच्याप्रमाणे कोपरगाव स्टेशनवर उतरून पुढे टांग्याने प्रवास करावा लागत होता, आणि चार आण्याच्या भाड्यात स्वतंत्र टांगा मिळत होता अनेकदा भाऊना बरोबर इतर प्रवासी असले तर आणा देऊनच तो प्रवास करता येत होता.

याही खेपेला भाऊ एक आणा खर्चूनच शिर्डीला पोहोचले होते आणि द्वारकामाईत जाऊन त्यानी आपल्या आराध्य दैवताचे दर्शन घेतले होते. या खेपेला भाऊ शिर्डीमध्ये तीन दिवस राहिले होते पण त्यांना त्या अवधीत आपल्या गुरुमाऊलीला एकटेच गाठून काही सांगण्याची संधीच मिळाली नव्हती. नेहमीच कुणी ना कुणी जवळ असायचे त्यामुळे आपले दैन्य प्रकट करण्याची भाऊना लज्जा वाटत होती.

चौथ्या दिवशी साईनाथांनी भाऊंना जवळ बोलाविले आणि म्हणाले, "तू आता घरी जा; तुला घरदार आहे की नाही?"

भाऊंचे अवसानच गळाले त्यांना जे काही सांगायचे होते ते सांगणे राहूनच गेले होते आणि साईनाथानी एकदा निरोप दिल्यानंतर तेथे थांबण्याचा रिवाज नव्हता. भाऊंनी अश्रूपूर्ण नयनांनी गुरुमाऊलीच्या पायावर मस्तक ठेवले आणि तेथून निघण्यासाठी दूर सरकले. पण श्रीसाईनाथांनी त्यांना हाक मारली आणि विचारले 'तुझ्याजवळ किती पैसे आहेत?'

भाऊंची आशा आता पल्लवीत झाली श्रीबाबांनी त्यांना हव्या असलेल्या विषयाची सुरवात केली होती. भाऊंच्या खिशात तीन राणी छाप रुपये होते व काही

चिल्लर होती. ते म्हणाले बाबा खर्चापुरते पैसे आहेत. ' ते पैसे मला दे. अरे फकिरालाही पैसे लागतात. ' बाबा म्हणाले.

त्यानंतर श्री बाबांनी भाऊंच्या खिशातील तीन रुपयेच नव्हे तर सर्व चिल्लरही काढून घेतली आणि ते म्हणाले, " आता तू थांबू नकोस टांगा वाट पाहात आहे. "

निराश झालेले भाऊ आपली प्रवासाची छोटी बॅग उचलून तेथून निघाले आता पैशाशिवाय मुंबई गाठायची कशी ? हा प्रश्न होता !

द्वारकामाईपासून ठराविक ठिकाणी टांगा उभा होता. टांगेवाला ओळखीचा होता पण सर्व जागा उतारुनी भरल्या होत्या तरीही टांगेवाल्यानी भाऊंची बसण्याची सोय लावली. बसण्याची गैरसोय झाल्यामुळे त्यानी भाऊंच्याकडून पैसे घेतले नाहीत. अर्थात भाऊ त्याला पैसे देणार होते कोठून !

भाऊ रेल्वेच्या फलाटावर उभे होते तिकिटाशिवाय मुंबई गाठायची कशी हा प्रश्न होता. थोड्याच वेळात मुंबईकडे जाणारी गाडी आली आणि त्यांच्या समोरच थांबलेल्या दुसऱ्या वर्गाच्या डब्यातून त्यांना कुणीतरी हाक मारली " वकीलसाहेब आमच्या डब्यात या. " विचार करण्यास वेळच नव्हता. भाऊ यंत्राप्रमाणे त्या डब्यात बसले. त्यांना हाक मारणारा त्यांच्या चांगल्या परिचयाचा रेल्वे अधिकारी होता. माझ्याजवळ तिकिट नाही असे भाऊंनी त्याला प्रांजलपणे सांगितले तेव्हा तो अधिकारी हसून म्हणाला, वकिल साहेब मी बरोबर असताना तुम्ही ती चिंता का करावी ? साईबाबांच्या कृपेने तुमची आमची कित्येक महिन्यानंतर भेट होत आहे. आणि भाऊंचा मुंबई कशी गाठावी हा अवघड प्रश्न सुटला प्रवासात खाण्यापिण्याची चंगळ होती आणि गप्पागोष्टीत तो दीर्घ प्रवास मोठ्या आनंदाने पार पडला होता.

बोरीबंदर स्टेशनावर उतरल्यानंतर भाऊंच्या मित्राने त्यांचा निरोप घेतला आता दार अडवून उभा असलेल्या तिकिटे घेणाऱ्या माणसाला चकवून बाहेर कसे पडावे एवढाच प्रश्न होता. त्यांनी ज्याच्या बरोबर प्रवास केला होता त्या अधिकाऱ्याने भाऊंची विवंचना दूर केली असती पण त्यांनाही भाऊंच्याकडे तिकीट नाही याचे विस्मरण झाले.

भाऊ जागच्या जागी उभे होते तो दार अडविणारा रेल्वेचा माणूस आपल्या कडेच पाहात आहे असे त्यांना वाटत होते. स्टेशनातून बाहेर पडल्यानंतर ओळखीच्या

माणसाकडे जाऊन त्याना घरापर्यंतच्या प्रवासाचे पैसे उसने घेता येणार होते. पण दार अडविणारा चेंगट अधिकारी आपली जागा सोडण्यास तयार नव्हता आणि एकाएकी दोन खेडवळ माणसे दारावरच्या अधिकाऱ्याला धक्के देत धावतच भाऊं जवळ आली आणि त्यांनी तीनशे रुपये असलेली थैली भाऊंच्या हातात दिली.

त्यांच्यातील एकजण म्हणाला, "साईबाबांनी तुमची आमची या ठिकाणी गाठ घालून दिली. मी माझ्या या मित्राला भेटण्यासाठी स्टेशनावर आलो होतो. तुम्ही अचानक भेटल्यामुळे माझा वसईला येण्याचा हेलपाटा वाचला. चार दिवसानी माझी केस सुरू होणार आहे पण हे पैशाचे जोखीम तुम्ही आतापासूनच सांभाळा!" भाऊंच्या डोळयात कृतज्ञतेचे अश्रू उभे राहिले साईनाथांनी त्यांची विवंचना दूर केली होती!

साईभक्तानो, साईनाथांची लीला कथन करणारी ही सत्यकथा ज्या भाऊंबद्दल मी लिहिली आहे ते माझे वडील होते.

श्रीसाईनाथ चरणी प्रणाम्!

▲ ▲ ▲

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे नवे इंग्रजी प्रकाशन

**श्रीसाईबाबा ऑफ शिरडी**

— लेखिका —

**श्रीमती पेरिन एस्. भरुचा**

श्रीबाबांच्या ६१ व्या पुण्यतिथीला प्रकाशित झाले.

प्राप्ती स्थळ : (१) श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी, जि. अहमदनगर.
(२) साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई ४०००१४.

# *** भक्तांचे परिपालन ***

— डॉ. रा. सि. कापडी, एम्. बी. बी. एस्.
वसुंधरा, राजारामपुरी, कोल्हापूर.

**तुमचा मी भार वाहीन सर्वथा । नव्हे हे अन्यथा वचन माझे ॥**

● साईबाबांवर अनन्यभावे प्रेम करणाऱ्या श्रद्धेने भक्ती भावाने बाबांवर साकडे घालणाऱ्या भक्तांचे बाबा अनेक मार्गाने परिपालन करीत. त्यांच्या कसोटीला उतरणाऱ्या भक्तावर जर कोणतेही संकट येणार असेल तर त्याची आगावू सुचना देऊन त्याचा परिहार करण्याची बाबांची हातोटी होती.

अहमदनगरमध्ये वस्ती करून राहणारे सरदार निमोणकर यांची सर्व कुटुंबीय मंडळी बाबांचे प्रेमळ भक्त होते. सरदार निमोणकरांचे चिरंजीव कोपरगावचे मामलेदार असताना चिथळी गावाला सरकारी तपासणीसाठी सरकारी भेट देण्याला निघाले.

परंतु शिरस्त्याप्रमाणे बाबांच्या चरणावर सुमनांजली वाहून पुढे जायचा त्यांचा परिपाठ असल्यामुळे ते शिरडीला बाबांच्या दर्शनास आले.

इकडच्या तिकडच्या गप्पा चालू असता बाबा एकाएकी मामलेदारांना म्हणाले, "तो लंबू बाबा माहीत आहे काय?" निमोणकरांना त्याचा उलगडा होईना. म्हणून डाव्या हाताचा पंजा उजव्या कोपऱ्याखाली धरून सर्प जसा फडा उभारतो तसा उजवा हात हालवून बाबा म्हणाले, "तो आपणाला काय करतो म्हणा. मशिदमाईची–द्वारकामाईच्या लेकराना त्याला भिण्याचे कारण नाही."

इतके सांगितल्यावरसुद्धा मामलेदार साहेबांच्या डोक्यात प्रकाश पडेना. चिथळीला जायला उशीर होतो म्हणून निघण्याची घाई ते करू लागले. बाबांच्या चरणाला वंदन करून आंगणात उभ्या असलेल्या टांग्याकडे पळाले. माधवराव देशपांडे-बाबांचे कल्याण त्यांना पोहचवण्यासाठी टांग्यापर्यंत गेले.

त्याला हाक मारून बाबा म्हणाले "तू सुद्धा त्यांच्याबरोबर चिथळीला जाईनास? ते धावत मामलेदार साहेबाकडे जाऊन म्हणाले" बाबा? तुमच्याबरोबर चिथळीस जाण्यास सांगत आहेत. थांबा जरा मी कपडे पेहरून येतो. मामलेदार म्हणाले "तुम्ही इतके लांब येण्याची कशाला तसदी घेता?"

माधवराव देशपांडे परत बाबांकडे आले आणि मामलेदारांचे हृद्गत सांगितले. बाबा म्हणाले आपले काय जाते, बस येथेच. इतक्यात निमोणकरांच्या मनात काय आले कोण जाणे. त्यांनी माधवरावाला हाक मारून सांगितले माझेच चुकले. बाबांनी स्वतःच ज्याअर्थी माझ्याबरोबर चिथळीला जाण्यास सांगितले त्याअर्थी त्यांचा काही तरी गर्भीत हेतू असावा. चला माझ्याबरोबर माधवराव म्हणाले, थांबा आता पुनः बाबांची परवानगी घेतली पाहिजे. त्यांच्या परवानगी शिवाय येथून हालता येत नाही. हे तुम्ही जाणून आहातच! माधवराव बाबांकडे पुनः परत आले, आणि निमोणकर बोलावित आहेत. परवानगी असावी. बाबा म्हणाले ते बोलावित असतील तर जा. त्यात त्यांचेच हीत आहे.


चिथळीला आल्यावर मामलेदारांच्या इतमामाप्रमाणे जी स्वतंत्र व्यवस्था केली होती तेथे रात्रौ कंदिलाच्या प्रकाशात उपरणे पांघरूण मामलेदार वर्तमान पत्रे वाचीत पडले. काही वेळाने वर्तमान पत्राचा सूर सूर असा आवाज त्यांच्या पट्टेवाल्याला आला. मामलेदार वर्तमानपत्र वाचीत दंग झाल्यामुळे त्यांचे तिकडे लक्ष गेले नाही पट्टेवाल्याने आपल्याजवळील दुसरा कंदील जरा उचलला, आणि तो दचकला. एक अस्सल भयंकर विषारी नाग मामलेदारांच्या पोटावरील उपरण्याच्या शेपटावर स्थीर झाला असून फडा पसरुन मोठ्या ऐटीत डोलत आहे असे त्याला दिसले. त्यांच्या तोंडातून हळूच "बापरे! सर्प रे सर्प" असे उद्‌गार निघाले. माधवराव तेथेच होते. त्यांनी सोटा घेऊन पाय न वाजविता ते मामलेदारांच्या रोखाने पुढे सरकले. लंबू महाराजाना माधवरावांची व पट्टेवाल्याची चाहूल लागली. तो निमोणकरांच्या उपरण्यावरून खाली उतरला. चांगल्या मोकळ्या जाग्यावर तो येताच काठ्या हातात उगारलेल्याच होत्या. त्या धडाधड लंबू महाराजांवर पडून त्यांची खांडोळी झाली. क्षणार्धातच हे सर्व घडून आले. मामलेदारांना या संकटाचे काहीच भान नव्हते. हे दृश्य दिसल्यावर मामलेदार गांगरले, भयभीत झाले. बाबांची मनोभावे क्षमा मागितली आपल्यावर असा प्रसंग येणार याची सुचना त्यांनीं आगावू दिली होती एवढेच नव्हे तर त्या प्रसंगाला तोंड देण्याकरता माधवरावांसारखा परम भक्त मदतीस दिला होता. बाबा भक्ताचे कसे परिपालन करतात हे या गोष्टीवरून सिद्ध होते. सुरवातीला दिलेली वचनोक्ती खरी ठरली.

❋ ❋ ❋

शिरडीतील श्रीबाबांच्या चावडीबद्दलची ही रंजक माहिती.

# .... बाबांची चावडी ....

—डॉ. म. स. बावरे
१०६, रा. ब. बोले रोड, दादर मुं. २८



● श्रीसंतचुडामणी सद्गुरु साईबाबा हे शिर्डीत असता एक दिवस द्वारकामाईत (मशीद) व दिवसाआड चावडीत झोपत असत. श्रींच्या वास्तव्याने पुनीत झालेली जी स्थाने आहेत त्यात श्री बाबांची चावडी हे एक महत्त्वाचे स्थान आहे. ह्या चावडीबद्दल समग्र माहिती फक्त बाबांच्या वेळच्या भक्तांना माहिती होती. त्याची नवीन भक्तांना माहिती व्हावी म्हणून हा लेख देत आहोत.

बाबांच्या वेळेस जे थोडे साईभक्त व सेवक होते त्यात ठाणे जिल्ह्यातील चिंचणी (तारापूर) येथील साईभक्त कै. दामोदर घनःशाम बावरे (ज्याना शिर्डीत अण्णा चिंचणीकर म्हणून संबोधिले जात होते) हे होते. कै. अण्णा बावरे चिंचणीकर व त्यांच्या धर्मपत्नी लक्ष्मीबाई ह्या दांपत्याने बाबांजवळ राहून त्यांची कित्येक वर्षे अविरत सेवा केली. ह्या दांपत्याला संतति नव्हती. एकदा द्वारकामाईत अण्णा चिंचणीकर व त्यांचे कुटुंब सेवा करीत असता शेजारीच कै. माधवराव देशपांडे उर्फ शाम्या व कै. काकासाहेब दिक्षीत हे होते. माधवरावांनी बाबांना सांगितले की, "देवा, हा काय, तुमा खेळ आहे? दूरदूरचे भक्त संतति अपेक्षेने

तुझ्याकडे येतात. त्यांची मनीषा तू पूर्ण करतोस. पण अण्णा व लक्ष्मीआई इतकी वर्षं तुझी सेवा करूनही तू त्यांना संतति का देत नाहीस ?" त्यावर बाबा स्मित करून उतरले. "शाम्या, तू लहान आहेस. मी कुणी मागितल्यानंतर दिले नाही असे झाले काय ? ह्या दांपत्यांनी मजजवळ काही मागितले नाही. म्हणून मी दिले नाही. विचार त्यांना मूल हवे काय ? मी देतो. पण शाम्या त्यांना मी जर मुलगा दिला तर तो अण्णांचे नाव एक पिढीपर्यंत चालवील. मी त्यांचे नाव अजरामर करणार आहे." वरील बाबांच्या बोलण्याचा अर्थ कुणास कळला नाही. त्यावेळी कै. अण्णांची पन्नाशी उलटून गेली होती. अण्णांचा डहाणू सिव्हील कोर्टात एक शेतकीचा दावा चालू होता. त्या संबंधित अण्णांनी बाबांना विचारले होते. प्रत्येक वेळी, 'अल्ला, तुझे भले करील.' असे बाबा उत्तर देत. हा दावा सतत ३ वर्षे चालू होता. अण्णांच्या तर्फे डहाणूचे प्रसिद्ध वकील कै. अच्युत नारायण खरे हे काम पहात असत. एकदा चेष्टा म्हणून कुणीतरी अण्णांना शिर्डीस पत्र लिहून कळविले की तुम्ही दावा हरलात. ते पत्र घेऊन अण्णा काकासाहेब दीक्षीत यांच्याकडे गेले व उभयता पत्र घेऊन द्वारकामाईत शिरत असतानाच बाबा मोठ्याने गर्जले. "ह्या थेरड्याला विश्वास नाही. फेकून दे पत्र." पत्रातील मजकूर बाबांनी अंतर्ज्ञानाने जाणला होता. नंतर काही महिन्यांनी कै. खरे वकीलांचे डहाणूहून पत्र आले. त्यात अण्णा खर्चासह दावा जिंकल्याचे व रु. १८०० ची डिक्री झाल्याचे कळविले होते. पुन्हा अण्णा काका दीक्षीतांबरोबर द्वारकामाईत गेले. बाबांनी सांगितले "आता विश्वास पटला ना ?" अण्णांनी ते पत्र बाबांच्या पायावर ठेवले व म्हणाले, "बाबा, हे तुमचे आहे मला नको." बाबा म्हणाले, 'वेड्या, माझा काय संसार आहे ? तुझे तू घे.' असे बराच वेळ चालले होते. त्यावेळी कै. काका दीक्षीतांनी तडजोड काढली की, अण्णांचे हे १८०० रु. घेऊन पडकी असलेली बाबांची चावडी दुरुस्त करून घ्यावी. ह्यास बाबांनी संमती दिली, व म्हणाले, ह्या चावडीला अण्णा व लक्ष्मीआईचे नाव द्या." त्याप्रमाणे ते नाव दिले, व ते नाव कै. लक्ष्मीबाई दामोदर बाबरे, बाबांची चावडी असे कोरलेले असल्याचे आजही आपण वाचू शकता.

कै. अण्णा चिंचणीकर हे आंतरबाह्य साईमय झालेले लेखकाने पाहिले आहे. त्यांना श्रीबाबांशिवाय दुसरे काही दिसत नसे. अशी गुरु भक्तात अभेद भक्ती निर्माण झाली होती. त्या गुरुभक्तीमुळेच त्यांनी आपली स्थावर-जंगम सर्व इस्टेट मोठ्या प्रेमाने श्रीच्या खर्चास शिर्डी संस्थानास अर्पण केली आहे. साईलीला मासिकाच्या शके १८४५ च्या १२ व्या अंकात त्यांचे मृत्यूपत्राची नक्कल छापली आहे.

त्यांच्या मृत्यूपत्राप्रमाणे त्यांच्या डहाणूच्या रहात्या वास्तूत 'शिवसाई मंदीर' बांधले आहे, व तेथे वैशाख शु. सप्तमीत दोन दिवस मोठा उत्सव चालतो, आजूबाजूच्या गावची बरीच मंडळी या मंदीरात येऊन दर्शन अभिषेक वगैरे करतात. त्यांच्या मृत्यूपत्राप्रमाणे येणाऱ्या भक्तांच्या सोयीसाठी एक सहाखोली अद्यावत् धर्मशाळाही बांधली आहे.

मृत्यूपत्रात इच्छा प्रदर्शित केल्याप्रमाणे अण्णांच्या येणाऱ्या वार्षिक उत्पन्नातून गोर-गरीबांस शिक्षण वैद्यकीय मदत तसेच गरीब विद्यार्थी यांच्यासाठी शिष्यवृत्या देण्याचा विचार विद्यमान विश्वस्त करीत आहेत. कै. अण्णांच्या मृत्यूनंतर परमसाईभक्त कै. देव मामलेदार यांनी तनमन धन अर्पण करणारा साईभक्त "असा अण्णा बाबरे यांचा गौरव साईलीला मासिकात केला होता. जाता-जाता एक गोष्ट नमूद करावी असे वाटते की शिर्डीस बाबांच्या समाधी मंदिरा समोर जो सभा-मंडप बांधला आहे त्यास झालेल्या रु. ६५००० खर्चापैकी "अण्णा चिंचणीकर ट्रस्ट' व 'कै. रासने ट्रस्ट" मधून मोठी रक्कम खर्ची पडल्याची नोंद सभामंडपाच्या महाद्वाराच्या उजव्या हातावर लावलेल्या शिला लेखावरून दिसून येईल. कै. अण्णा दाभोळकर कृत श्रीसाई सत्चरित्रात अण्णा बाबरे यांचा उल्लेख अध्याय २४ मध्ये आहे.

कै. अण्णा बाबरे यांचे नाव अजरामर करण्याची बाबांची भविष्यवाणी खरी ठरल्याचे आज चावडी दर्शनाने आपल्याला दिसून येते.

---

## श्रीसाईलीला लेखक-कवी स्नेहसंमेलन—शिरडी
## सहावे संमेलन १९८०
**विशेष माहिती दिवाळी अंकात वाचा.**

● मुखपृष्ठावरील चित्र श्री बाबांचे १९१० साली टिपलेले असून ते आम्हास ब्लॉकमेकर डी. डी. नेरॉय यांनी उपलब्ध करून दिले आहे.

# श्रीकृष्ण साई–स्वयमेव मृगेन्द्रता

—डॉ. अनिल जायस्वाल, एम्. बी. बी. एस.
द्वारा श्रीसाई क्लिनिक, चितरओळ,
नागपूर–२ पिन ४४० ००२.



'श्रीकृष्ण लीला' निरोध लीला आहे.
'श्रीसाई लीला' निरोध लीला आहे.

मनाचा निरोध झाल्यावरच मुक्ती सुलभ असते. मनाचा निरोध ईश्वरातच होणे शक्य आहे. इतर कोणत्याही वस्तुत होणे ते शक्य नाही. कारण संसार जड आहे, मन जड नाही. दुधात टाकलेली साखर सजातियाप्रमाणे ती त्याच्याशी एकजीव होते. विरघळून जाते. विलीन होते. परंतु दुधात टाकलेले दगड एकरूप होणे कदापि शक्य नाही. जे पूर्णतः चेतन नसून पूर्णतः जडही नाही–अशी मानवी मनाची स्थिती आहे. मन अर्ध चेतन व अर्ध जड असे आहे.

अधर्माद्वारे धनाचा अर्जन करणारा व अनीतिपूर्वक त्याचा उपभोग घेणारा–तो पामर जीव.

धर्माचा पालन करून कमविणारा व त्या संपत्तीचा इन्द्रीय सुखासाठी उपभोग करणारा–तो विषयी जीव.

संसारीक बंधनापासून मुक्तीप्राप्तीची इच्छा करणारा व त्यासाठी झटणारा तो मुमुक्षू जीव.

आणि कनक व कांतारूपी मोहमायेच्या बंधनातून मुक्त होऊन प्रभुचिंतनात तन्मय होणारा–तो मुक्त जीव.

आपण श्रीसाईसमर्थांच्या छत्रछायेखाली वावरणारी लेंकरे. माया तर ही एक दासीमात्र आहे. संगोपनासाठी, कुरवाळण्यासाठी, करमणूकीसाठी व आपण शिशुंची सर्व काळजी वाहण्यासाठी श्रीसाईकृष्णांनी मायेस आपली चाकरी करण्यास ठेविले आहे. ती आपण सर्व दिशेने, सर्व बाजूने काळजी वाहत असते. परिणामस्वरूप आपण स्वतःस मायेद्वारे वेढलो आहोत. मायेचे कर्तव्य आपणास किंचित्मात्र दुःख न देता, सतत सुख देणे असून ते कार्य ती दक्षतेने, निपुणतेने, कुशलतेने बजाविते. तरीपण आपण भुलतो. आपल्या फसवणूकीचे जवाबदार दुसरा तिसरा कोणी नसून आपण स्वतःच आहोत.

स्वरूपाचे जे विस्मरण । तेंचि मायेचे अवतरण ।
शुद्ध पूर्णानंदस्मरण । तोचि मी चैतन्य घनरूप ॥ –(श्रीसाईचरित)

माया कधी भुलवित नसून आपण स्वतःच
भुलतो, व आपली चूक लपविण्यासाठी
व्यर्थच आपण मायेस दोषारोपण करतो.

आपल्यातच जर संयम नसेल
तर त्यास माया देखील काय करणार ?

परमात्म्याशी घनिष्ठतेने प्रेम करा. मायेचे बंधन आपोआप तुटेल. श्रीसाई-लीलेचे व श्रीकृष्ण लीलेचे रहस्य ते हेच.

श्रीसमर्थ शुकदेव ऋषींनी राजा परीक्षिताची, त्याना श्रीकृष्णलीला ऐकविण्या-अगोदर करून कसोटी घेतली. काय तर म्हणे सतत पाच रात्रंदिवस (भागवताचा दशम स्कंध ऐकविण्याअगोदर) परीक्षितास मुळीच हालता न डुलता त्यांनी एकाच आसनावर बसावयास लाविले. राजा परीक्षिताची उत्सुकता इतक्या उग्र व उच्च स्वरूपाची होती की ते म्हणतात :—

"देवा ! आपण सांगत असणाऱ्या कथेद्वारे
माझे चित्त पूर्णतः हरपले गेले. मी देहभान

विसरलो. सतत ऐकत असणाऱ्या अमृत
वाणीद्वारे माझे मन सुखावले. तरीपण
अधिकाधिक ऐकत रहण्यास हे मन सारखे
उतावीळ होत आहे."

वाचकांनो! सतत पाच दिवस अगोदरपासून भूक-तहान विसरून राजा परीक्षित एकाच आसनात श्री शुकदेवजींच्या समोर बसलेले आहेत. त्यांनी असे म्हणावे,—हे एक आश्चर्यच! तरीपण योग्य सत्पुरुषाच्या मुखकमलद्वारे मधुर वाणीत वाहत असणाऱ्या श्रीहरिकथामृत श्रवण करण्याचाच कदाचित हा परिणाम असावा. "कथा रसपानामुळे मी आपली भूक-तहान विसरलो"—असे उद्गार काढणाऱ्या राजा परीक्षितासारखा श्रावक (ऐकणारा) मिळणे दुर्लभच म्हणायचे. काय त्यांची सुपात्रता काय त्यांची जिज्ञासा!

कथेत अशीच तन्मयता पाहिजे. श्रीकृष्णकथा किंवा श्रीसाईकथा पण याच श्रेणीची ऐकणारा जिज्ञासु जर भाविक व सुपात्र असेल तर तो श्री साईकथा श्रवण करताना सहजच संसारास विसरतो. श्रीसाईकृष्णकथा जगाचा विस्मरण करविते. देहभान विसरविते. श्री साईकथा महिमावंती आहे. श्रीसाईकथेत लीन असणारा मन संसारात विसरतो. श्रीसाईकृष्णकथा आपणास आपल्यातील विद्यमान असणाऱ्या दोषांना दर्शविते. श्रीकृष्णसाई कथेद्वारे आपण कोठे चुकत आहो–ते आपणास सहजच उमजते कथा ऐकल्यावर डोळे अश्रूंनी ओथंबले तरच समजावे की कथा वाचली वा ऐकली गेलेली आहे.

श्रीकृष्ण कथेत—अंबरीशाची भक्ती किती दिव्य स्वरूपाची होती.।

श्रीसाईकथेत—काकासाहेब दीक्षितांची भक्ती किती दिव्य स्वरूपाची होती.।
(श्रीसाईलीला विशेषांक भाग १२ अंक ६–९ व श्रीसाईसच्चरित अध्याय ५०)

वाचकांना माहीतच असेल की तारीख ५ जुलै १९२६ रोजी श्री काकासाहेब दीक्षित हेमाडपंताबरोबर श्रीसाई कथेत इतके तल्लीन होऊन गेले की चालत्या आगगाडीच्या डब्यातच ते देहभान विसरले व त्या तंद्रीतच त्यांचे प्राणोत्क्रमण होऊन दाभोळकर उर्फ हेमाडपंताच्या खांद्यावर त्यांची मान टेकली.

"शेवटी मी तुला विमानातून घेऊन जाईन."

हे श्रीसाईसमर्थांनी काकासाहेबास दिलेले वचन सत्य ठरले. परंतु वरील श्रेष्ठ व थोर भक्तांची तुलना या ओळी लिहून आपल्यापुढे सादर करणाऱ्या लेखकाशी करावयाची असेल तर निदान स्वतःविषयी तरी स्वमनातले उद्‌गार सहज तरंगले जातात की; "काय माझे हे जीवन। एका धूर्त, लबाड, पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणेच वाया गेले।"—हे कठोर सत्य लपविता येणे—अशक्यच म्हणायचे.

'श्रीसाईलीला' सर्वांस आनंद देते. लहान मुलांपासून ते आबाल वृद्धापर्यंत ज्ञानी, योगी, त्यागी, भोगी, रोगी, राजस, तामस व सात्विक प्रकृतिच्या सर्वा-सर्वांना ती मोहीत करून घेण्यास: समर्थ आहे. मानवी मन हे सदैव कोणत्या न कोणत्या रसात फसलेले असते. परंतु ज्याने प्रेमरसाचे आस्वाद घेतले असेल त्यास इतर सर्व रस अ—रसासारखेच आहे.

'साकर शेरडीनो रस त्यजीने
कडवो ते लीमडो घोळमा।
शिरडी-साईनाथ विना
बीजुं बोल मा॥'

**अर्थात :** श्रीसाईप्रेम साखर व उसाचा गोड रस आहे. त्यास त्यागून कडू-लिंबाचा (संसारीक) रस का प्यावा? शिर्डी-साई शिवाय इतर काय व कशासंबंधी बोलत बसावे?

होय, हे सर्व खरे. परंतु या श्रीसाईरसाचे आस्वाद करणे—काही सोपी, साधी गोष्ट नव्हे.

कारण श्रीकृष्ण रसाविषयी श्री नरसिंह मेहता म्हणतातः—

"ए रसनो स्वाद शंकर जाणे के जाणे शुक्र जोगी रे।
कंई एक जाणे व्रजनी रे गोपी, भणे नरसैंयो भोगी रे॥"

अर्थातः—या प्रेमरसाचा आस्वाद शंकर, शुकदेव, जोगी आणि व्रजच्या गोपीका सारख्याच उपभोगू शकतात.

वाचकानो! संसारिक सर्व रस या प्रेमरसापुढे फिके पडतात. काही रस सुरवातीस गोड वाटतात परंतु त्यांचा शेवट मात्र दु:खदच होतो. फक्त प्रेमरसच मधूर आहे. प्रेमाभावी साक्षात्कार होणे अशक्य आहे. श्रीकृष्ण—श्रीसाई प्रेमरूप आहेत. ते अलौकीक प्रेमरस दान करतात.

अलीकडील मानवाने 'प्रेम' शब्दासच कलंकीत करून ठेविलेले आहे.

जिथे विकार व वासनेस जागा आहे,
तिथे प्रेम राहूच शकत नाही.
फक्त मोहानेच हे जग ओथंबलेले आहे.

स्त्री-पुरुषामधील प्रेम–प्रेम नसून मोह आहे. पति-पत्नि यांनी परस्परावर प्रेम करून सुद्धा अनासक्त राहवयास पाहीजे. प्रेमरसात विकार वासनेचा पूर्णतः अभाव आहे. त्यात स्वार्थ व विषमताही नाही. त्यात मी-तू पणाला मुळीच वाव नसून फक्त एकरूपता आहे.

श्रीकृष्ण लीलेत गोपिका म्हणते.
"लाली मेरे लालकी
जित देखुं तित लाल!
लाली देखन मैं गयी,
मैं भी हो गई लाल ॥"

गोकुळातल्या गोपिका कृष्णास पाहावयास गेल्या. त्यांना पाहताक्षणीच त्या स्वतःस विसरल्यात. श्रीकृष्णाशी त्या एकरूप व एकजीव झाल्या. स्त्री-पुरुष हा भेदभाव मावळला.

श्रीकृष्णाप्रमाणेच अलौकीक व चमत्कारीक घटना श्रीसाईनाथांविषयी हल्ली घडत आहेत. या संदर्भात श्रीसाईलीला मासिक वर्ष ३३ वे अंक ३ मधील पृष्ठ १९ वरील श्रीवाङ्मय प्रभु त्रिलोकेकर द्वारा उल्लेखित घटना लक्षवेधक आहे. ती अशीः—

"ह. भ. प. श्री दादासाहेब सबनीस, एक सुप्रसिद्ध ज्ञानेश्वर भक्त XXXX होते. श्री. सबनीस ह्यांच्या गुरूंनी समाधी घेतल्यानंतर त्यांच्या जीवनात अकस्मात् एक पोकळी पडल्यासारखे त्यांना झाले. अशा उदास मनःस्थितीत ते शिर्डीस गेले. शिर्डीस जाऊन द्वारकामाईत ज्ञानेश्वरी वाचण्याचा त्यांनी संकल्प केला. ज्ञानेश्वरी वाचण्यापूर्वी त्यांनी श्रीसाईबाबांची अशी प्रार्थना केली कीः– "बाबा! मी ज्ञानेश्वरी वाचणार आहे. पण ती तुम्ही ऐकता की नाही हे मला कसे कळणार! त्याचप्रमाणे बाबा आपल्या सान्निध्यात असणाऱ्या तत्कालीन भक्तांचे दर्शन पण व्हावे"–अशी सुद्धा त्यांनी इच्छा व्यक्त केली.

त्यांच्या श्रीज्ञानेश्वरीच्या पारायणाच्यावेळी डोकीस शुभ्र रूमाल बांधलेली अशी एक महान तेजस्वी व्यक्ती त्यांचे पारायण ऐकून गेली. त्या व्यक्तीची माहीती तिथे हजर असणाऱ्या गावातील माणसास नव्हती. तसेच भक्त अब्दुल्ला आणि श्रीमती लक्ष्मीबाई शिंदे ह्यांनी सुद्धा त्यांना भेट देऊन त्यांच्या इच्छा पूर्ण केल्या.

विसाव्या शतकातील सुप्रसिद्ध अमेरीकन तत्ववेत्ता विलीयम जेम्स, ह्याने या विषयावर सखोल अभ्यास करून 'व्हरायटीज ऑफ रिलीजियस एक्सपरियन्सेस' म्हणून एक ग्रंथ लिहीला असून त्याचा पहिला सिद्धांत तो असा की;

'व्यक्त जग हे एका पवित्र अशा अव्यक्त जगाचा
भाग आहे. त्या आध्यात्मिक अव्यक्ताबरोबर व्यक्त
जगाचा दुवा सांधणे हे जीवनातील अंतिम कार्य
होय. प्रार्थना किंवा भक्तीच्याद्वारे आत्मानुभवाच्या
प्रसादाने अव्यक्त घटना आणि व्यक्त घटना यांच्या
संगमामुळे एक शक्ती निर्माण होऊन भक्तांच्या
अनुभवात अघटित अशा घटना घडून येतात.'

आपल्या प्राचीन भारतीय संस्कृतीत देखिल श्वेताश्वेतरोपनिषदांतिल आठवा मंत्र वरील सिद्धांतास सर्वस्वी पोषक आहे. तो मंत्र असा :-

'संयुक्त मेतत्क्षरमक्षरं च—
व्यक्ताव्यक्तं भरते विश्वमीशः!
अनीशश्चात्मा बध्यते भोक्तृं भावा—
ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशै ॥ ८ ॥'
(श्वेताश्वेतरोपनिषद)

या वरील विवेचनावरून भक्तांचे अनुभव हे आत्मप्रवण असल्यामुळे सर्वस्वी श्रेयस असेच असतात—असे ठामपणे म्हणण्यास मुळीच हरकत नाही.

श्रीसाईसमर्थासमोर देखिल मी व माझेपण शेष राहूच शकत नाही. जसे सतीचे पतीकडे, कृपणाचे धनाकडे किंवा विषयी माणसाचे विषयाकडे मन ओढले जाते, निदान तितक्या तरी तीव्रतेचा ओढा जेव्हा ईश्वराविषयी मानवी मनात उत्पन्न होतो तेव्हाच ईश्वराचा लाभ होणे शक्य आहे.

मानवी जीवनाची विशेषता व सार्थकता हिच की सर्वकाही विसरून श्रीकृष्ण-साई वा श्रीरामसाईच्या प्रेमात वेडे होणे. नित्यनियमित श्रीसाई–कृष्ण–रामास एकाग्रचित्ताने प्रार्थना करू या :—

"बाबा ! माझे मन चंचल आहे. ते माझ्या
ताब्यात मुळीच नाही. आपणच माझ्या
मनास आपल्या स्वतःकडे ओढण्यास वा
आकृष्ट करण्यास सर्वस्वी समर्थ आहांत.
म्हणून इच्छा हिच की आपणच या
मनास आपल्याकडे ओढून घेण्याची
कृपा करावी. बाबा ! ज्या ज्या स्थळी हे मन जाय माझे ।
त्या त्या स्थळी हे गुरुरुप तुझे ।।
मी ठेवितों मस्तक ज्या ज्या ठिकाणी ।
तेथे तुझे साईनाथा पाय दोन्ही !! "

श्रीकृष्णाप्रमाणेच श्रीसाईसमर्थ जन्मजात शासक होते–असे म्हणावयास अतिशयोक्तीचे होणार नाही. त्यांचे शासन हृदयावर चालते. अशा शासकास राज्याभिषेकादीची आवश्यकता नसते. ★

## — अभिनंदन —

कु. अविनाश प्रभाकरराव नागपूरे. श्रीसाईनाथ माध्यमिक विद्यालय शिरडी हा विद्यार्थी माहे एप्रिल सन १९७९ मधे झालेल्या एस. एस. सी परिक्षेत ७०० पैकी ५७६ गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. राहता केंद्रात ८२% गुण मिळवून साईनाथ माध्यमिक विद्यालयात त्याने उच्चांक प्रस्थापित केला. प्रत्येक वर्षी प्रथम क्रमांकाने पास होत असल्यामुळे विद्यालयातील एक हुशार विद्यार्थी म्हणून सर्वामध्ये प्रसिद्ध होता. विविध प्रकारच्या स्पर्धामध्ये व खेळामधे भाग घेऊन त्याने अनेक पारितोषिके मिळविली. पुढील शिक्षणासाठी तो फर्ग्युसन कॉलेज पुणे येथे शास्त्र शाखेकडे दाखल झाला आहे. मुख्याध्यापक श्री. म. वा. बर्डे व शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळेच हे यश लाभले. त्यांनी त्याला पुढील यशाच्या सुभेच्छा दिल्या आहेत. कु. अविनाश हा श्रीसाईबाबा संस्थानचे वरिष्ठ लेखापाल श्री. प्रभाकरराव शाः नागपूरे यांचा मुलगा असून सेवानिवृत्त लेखाधिकारी श्री. शांताराम पा. नागपूरे यांचा नातू आहे.

# श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी.

# श्रीसाईबाबा मूर्ती स्थापना रजत जयंती महोत्सव १९७९

## व

## श्री ६१ वा पुण्यतिथी उत्सव १९७९

श्रीसाईबाबांचे मूर्ती स्थापनेचा (२५ वर्षे पूर्ण होत असलेने) रजत जयंती उत्सव व त्याच वेळी श्रींची ६१ वी पुण्यतिथी येत असल्याने यंदाचा पुण्यतिथी उत्सव भव्य प्रमाणावर साजरा करण्याचे ठरविण्यात आले आहे.

या वर्षी पुण्यतिथी उत्सव हा ४ दिवसा ऐवजी ५ दिवस साजरा करण्यात येणार आहे. उत्सव दि. २९–९–७९ ते ३–१०–७९ या मुदतीत साजरा होणार असून दि. १–१०–७९ विजयादशमी (दसरा) हा श्री बाबांचा महानिर्वाणाचा पवित्र दिवस उत्सवाचा मुख्य दिवस असेल.

उत्सवा निमित्त नेहमी प्रमाणे संस्थान परिसरात मंडप व कमानी उभारण्यात येणार असून रजत जयंती निमित्त नगर मनमाड रोडवर उत्तर व दक्षिण बाजूस खास आकर्षक अशा २ कमानी उभारण्यात येणार आहेत. प्रवेशद्वाराचे कमानीवर नगारखाना तयार करण्यात येणार असून तेथे उत्सवाचे पाचहि दिवस सनई व चौघडा वादन होईल.

संस्थान परिसर विशेषतः श्रीं चे समाधि मंदिर, द्वारकामाई, गुरुस्थान, चावडी दत्तमंदीर इत्यादि मंदिरात खास विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे.

उत्सवास येणारे भक्तांची वास्तव्याची व्यवस्था संस्थानचे इमारतीतून तसेच येथील माध्यमिक व प्राथमिक शाळेचे इमारतीतून करण्यात येणार आहे.

उत्सवाच्या मुदतीत भक्तांना नेहमीच्या दरात मिष्टान्न प्रसाद देण्यात येईल. तसेच गोरगरीब अपंगांना अन्नदान करण्यात येणार आहे.

## उत्सवात महत्वाचे कार्यक्रम खालील प्रमाणे असतील

### दि. २९-९-७९ ... १ ला दिवस. शनिवार

पहाटे ५-१५ श्रींची काकड आरती.

सकाळी ६-०० श्रींचे फोटोची व पोथीची मिरवणूक व द्वारकामाईत स्थापना आणि भक्तांचे साईचरित्र अखंड पारायणारंभ. रजत जयंती निमित्त यंदा पारायण कार्यक्रम दोन दिवस ठेवला असून पारायण समाप्ती दि. १-१०-७९ रोजी सकाळी होईल. पारायणात भाग घेणाऱ्या भाविकांना प्रसाद म्हणून श्रीफळ देण्यात येते.

दुपारी ४ ते ६ कीर्तन.

रात्रौ ७-०० ते ११-०० रेडिओस्टार श्री. स्नेहल भाटकर आणि श्री. वरळीकरबुवा मुंबई यांची भजने.

रात्रौ ११-०० ते ११-३० शेजारती.

### दि. ३०-९-७९. रविवार

पहाटे ५-१५ ते ५-४५ श्रींची काकड आरती.

दुपारी ४-०० ते ६-०० प्राचार्य श्री. शिवाजीराव भोसले यांचे प्रवचन.

रात्रौ ७-३० ते ९-०० व ९-३० ते ११-०० कलाकारांची हजेरी.

रात्रौ ९-१५ ते ११-०० श्रीं चे पालखीची गावातून मिरवणूक.

रात्रौ ११-०० ते ११-३० शेजारती.

### दि. १-१०-७९ सोमवार...विजयादशमी (दसरा) मुख्य दिवस.

पहाटे ५-१५ ते ५-४५ श्रींची काकड आरती.

सकाळी ६-०० अखंड पारायण समाप्ती व श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक. श्री द्वारकामाईतून समाधि मंदिराकडे.

सकाळी ९-०० भिक्षा झोळी कार्यक्रम.

सकाळी १०-३० ते १२-०० श्री पुण्यतिथी कीर्तन.

दुपारी १-०० ते २-३० विजयादशमी हा श्री बाबांचा' महानिर्वाणाचा पवित्र दिवस असल्याने या दिवशी संस्थान तर्फे आराधना विधी केला

जातो. संस्थान तर्फे पुरोहितांना वस्त्रदान व गोरगरिबाना अन्नदान केले जाते.

दुपारी ५-०० ते ६-०० सीमोल्लंघन कार्यक्रम. समाधि मंदिरातून मिरवणूक श्रीखंडोबाचे मंदिरापर्यंत व परत.

रात्रौ ७-३० ते ९-०० श्री उपासनी महाराज कन्या कुमारी आश्रम, साकुरी यांचे तर्फे मंत्रपठण.

रात्रौ ९-१५ ते ११-०० रथाची मिरवणूक गावातून.

रात्रौ ११-०० ते सकाळी ६-०० } कलाकारांची हजेरी.

श्री समाधि मंदिर रात्रभर उघडे राहिल.

## दि. २-१०-७९ मंगळवार

सकाळी ६-०० श्रींचे मंगलस्नान.

सकाळी ७-३० गुरुस्थान येथे रूद्राभिषेक.

सकाळी ९-३० ते ११-०० या महोत्सवानिमित्त बालक वर्षा निमित्त श्री साईबाबा निबंध लेखन स्पर्धा वगैरे बाबतचा बक्षीस समारंभ. बालकांना गणवेष व खाऊ वाटप कार्यक्रम. स्थानिक विद्यालयातून भाषण स्पर्धा.

दुपारी ४-०० ते ६-०० प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे प्रवचन.

रात्री ८-०० ते ११-०० श्रीसाईबाबा शिर्डी...मराठी चित्रपट दर्शन.

रात्री ११-०० ते ११-३० शेजारती.

## दि. ३-१०-७९ बुधवार

पहाटे ५-१५ ते ५-४५ श्रींची काकड आरती.

सकाळी १०-३० ते १२-०० गोपालकाला कीर्तन व दहीहंडी कार्यक्रम.

दुपारी ४-०० ते ६-०० प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे प्रवचन.

रात्री ७-३० ते १०-०० कलाकारांची हजेरी.

रात्री १०-०० ते १०-३० शेजारती व उत्सव समाप्ती.

उत्सवात पाचही दिवस वैयक्तिक अभिषेक न होता सामुदायीक अभिषेक मर्यादित स्वरूपात करण्यात येतील.

श्रींना अर्पण केलेल्या वस्त्रांची व इतर वस्तूंची प्रसाद रूपाने जाहीर लिलावाने विक्री करण्यात येईल यात असंख्य भक्त चढाओढीने भाग घेतात.

सिंहस्थ पर्वणीमुळे या महोत्सवास विशेष जादा गर्दी होईल आणि लाखो भक्त श्रींचे दर्शनाचा लाभ घेतील असा अंदाज आहे.

येणाऱ्या भाविकांची जादा एस. टी. गाड्या सोडून प्रवासाची सोय होणे करिता संबंधित अधिकारी यांना संस्थानने विनंती केली आहे. तसेच मुंबई व्ही. टी. हून सुटणाऱ्या रेल्वे गाड्याना जादा डबे जोडण्याबद्दलहि विनंती केली आहे.

उत्सव शांततेने व सुव्यवस्थित रित्या पार पाडावा याकरिता संस्थान अधिकारी व सेवक दक्ष आहेत.


## * श्रीसाईलीला *

**सर्वांगसुंदर भव्य दिवाळी अंक १९७९**

* भगवान श्रीसाईबाबांच्या जगभर पसरलेल्या असंख्य साई भक्तांना आलेल्या बाबांच्या विषयीच्या विविध अनुभवांनी अगदी गच्च असा सुंदर संग्राह्य वाचनीय अंक ऐन दिवाळीत थाटात प्रसिद्ध होणार.

प्रसिध्दीची तारीख १५ ऑक्टोबर १९७९

**मुखपृष्ठावर** बाबांचे मनोहर चित्र **किंमत सव्वा रुपया**

# — श्रीसाईनाथाय नमः —

परम कृपाळू दयाघना
दीनांच्या संकटहरणा
धांव घेऊनी तारिसी भक्ता
तुम्ही साईनाथा ॥ १ ॥

भक्तावरल्या अतुट प्रेमा
न करू शके कोणी तुलना
माते समान धावूनी येता
तुम्ही साईनाथा ॥ २ ॥

जगी तुम्हावीण नसे त्राता
चित्त शांत राखी मम आता
नामस्मरणी बुद्धू द्या मजला
तुम्ही साईनाथा ॥ ३ ॥

एवढी विनंती करिते चरणी
दुसरी नसे मम आता मागणी
तुमच्या चरणी ठाव द्या मज
तुम्ही साईनाथा ॥ ४ ॥

—कु. जयंती जोशी
२८, जावळे भुवन,
तळमजला, भवानी शंकर रोड,
दादर, मुंबई ४०००२८

# – तुम्ही संतजन –

तुम्ही संतजन, जनी जनार्दन
आम्हां न याचें भान
    हिरा-कोळसा एकच आम्हां
दिसतां उघडी खाण ॥ ध्रु० ॥

जन्म कोणत्या देशी, अथवा
याती हीन महान्
    नामनिशानी ना उरलेली
सर्वच कोरें पान ! ॥१॥

आकाश टाकी तुम्हांस खाली
झेली भूमि, रान
    झोळी कांखे, अलख् निरंजन
हेच कुळाचे दान ! ॥२॥

भूमि आसन, नभ आच्छादन
ओठी प्रभु गुणगान
    सेंच जगासी दिले वाटले
उरले मग प्रस्थान ! ॥३॥

—प्रा. र. श्री पुजारी
रमानिवास, ९९२ सदाशिव, पुणे–३०.

# — तूं माझा त्राता —

उभा पाठिशी तूं असताना कसली मज चिंता ?
सद्गुरु तूं माझा त्राता ॥ ध्रु ॥

आजार अथवा दुखणें खुपणें
असो कुणाचे काही देणे
खंत यशाला त्याची करणे
कृपाछत्र तव सदैव माझ्या — शिरावरी असतां ॥१॥

मार्ग नीतिचा कशास सोडू ?
स्वार्थासाठी कशास भांडू ?
उणे कुणाचे कशास काढू ?
तुझ्यासारखा समर्थ असतां — मम रक्षणाकर्ता ॥२॥

तीर्थरूप तूं तूंचि माउली
तूंच निवारा तूंच सावली
धांवतोस तू संकटकाळीं
तुझ्याविना मज दुसरा कोणी — नसे दुःखहर्ता ॥३॥

— श्री. शंकर इनामदार
शंकरपुरा पेठ, महाजन वाडा, जुन्नर, (जि. पुणे)

# शिरडी-वृत्त माहे जुलै सन १९७९
## गुरुपौर्णिमा-उत्सव.

या महिन्यात गुरुपौर्णिमा उत्सवाकरिता आलेल्या साईभक्तांची व पंढरपूर येस जाणारे व परत येणारे अशा भक्तांची साईदर्शनासाठी गर्दी झाली ती.

**गुरु पौर्णिमा उत्सव पहिला दिवस :–** रविवार दि. ८-७-७९ रोजी हाटे५ वा. मंदिर उघडले. ५-१५ वा. काकड आरती झाली. ६ वाजता श्रींच्या फोटोची पोथीची मिरवणूक समाधि मंदिरातून गुरुस्थानमार्गे द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी दीच्या भव्य सिंहासनात बाबांचा फोटो ठेऊन पोथी वाचनास सुरुवात झाली. चे मंगलस्नान, अभिषेकपूजा आरती वगैरे नित्याचे कार्यक्रमा व्यतिरिक्त सायंकाळी ३० ते ६-३० पर्यंत ह. भ. प. कमलाकर बुवा औरंगाबादकर पुणे, यांचे कीर्तन ले. रात्रौ ७-३० ते ९ व ९-३० ते ११ वाजेपर्यंत श्री. प्रभाकर कारेकर आकाश-णीकलावंत मुंबई यांचे सुश्राव्य गायन झाले. रात्रौ ९-१५ ते ११-३० पर्यंत च्या पालखीची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस :–** सोमवार दि. ९-७-७९ रोजी ५ वा. मंदिर घडले. ५-१५ वा. काकड आरती झाली. श्रींच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच क्तांच्या रांगा लागल्या होत्या. सकाळी ६ वा. श्रीसाईसच्चरित अध्याय वाचन पाची मिरवणूक द्वारकामाईतून गुरुस्थान मार्गे समाधि मंदिरात आली. त्यानंतर चे मंगलस्नान झाले. नित्याचे कार्यक्रम व्यतिरिक्त सायंकाळी ४–३० ते ६–३० र्यंत ह. भ. प. औरंगाबादकर महाराज यांचे कीर्तन झाले. रात्रौ ८ ते दुसरे वशी सकाळी ६ वाजेपर्यंत कलाकारांचे भजन, गायन; वादन वगैरे कार्यक्रम झाले. त्री ९-१५ वा. श्रींच्या रथाची भव्य मिरवणूक मोठ्या थाटात निघाली. श्रीसाईनाथ माध्यमिक विद्यालय शिरडी बॅण्ड पथक, राहाता अमरावती येथील बँड पथके, संस्थान कर्मचाऱ्यांचे लेजीम, सनई, चौघडा, डफ, शिंगवादन, टाळ, मृन्दग यांचे गजरात रथाची मिरवणूक गावातून आली. मिरवणूकीचे वेळीं स्थानिक ग्रामस्थानी गारुड गारुड कार्यक्रम केले. पुण्याचे श्री. रघुनाथ सांडभोर यांनी नकलांचे कार्यक्रम केले. मिरवणूक रात्रौ १२-४५ ला मंदिरात आल्यावर भक्त मंडळी कलाकारांचे कार्यक्रमात सामिल झाली. श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले ठेवण्यात आले होते.

**उत्सवाचा तिसरा दिवस** :- मंगळवार दि. १०-७-७९ रोजी नित्यकार्यक्रमा व्यतिरिक्त श्रींच्या वस्त्रांची प्रसाद रुपाने लिलावाने विक्री झाल्यावर संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांचे गोपाल काला कीर्तन सकाळी १०-३० ते १२-१५ पर्यंत झाले. त्यानंतर दहिहंडी कार्यक्रम झाल्यावर माध्यान्ह आरती झाली व भक्तांना तीर्थ प्रसाद वाटण्यात आला. रात्रौ ७-३० ते १० वाजे पर्यंत श्री. चंद्रशेखर गाडगीळ व पार्टी पुणे. यांचा "सप्तस्वरोमें साईबाबा" हा कार्यक्रम झाला. त्यानंतर शेजारती होऊन उत्सव समाप्त झाला.

---

काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे :-

**कीर्तन** :- १) श्री. ग. वि. जोशी शास्त्री संस्थान गवई यांची कीर्तने एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.

**भजन, गायन, वादन वगैरे** :- १) श्री. मधुकर गो. सोनवणे. बडोदा. २) श्री. मनोहरराव लोणकर पुणे. ३) श्री. गंगाधर जाधव पुणे. ४) श्री. ज्ञानोबा नगरकर पुणे. ५) श्री. श्रीराम वि. सातर्डेकर मुंबई. ६) श्री. नाना मुळे. मुंबई. ७) श्री. पुरुषोत्तम बालावलकर मुंबई. ८) श्री. जाधव मुंबई. ९) श्री. बाळकृष्ण दा. बिडवे पुणे. १०) श्री. पद्माकर बिडवे पुणे. ११) श्री. प्रसाद हुडे पुणे. १२) श्री. चंद्रकांत शा. लोणकर पुणे. १३) श्री. जयवंत कुलकर्णी मुंबई. १४) श्री. मल्लेश मुंबई. १५) श्री. रुपकुमार राठोड मुंबई. १६) श्री. मिरजकर मुंबई. १७) कुमारी कुलकर्णी संगिता मुंबई. १८) कु. कोटस्थाने पंकजा शिरडी. १९) कु. किशोरी जयवंत मुंबई. २०) श्री. शरद बा. खळदकर पुणे. २१) श्री. महादेव तुपे पुणे. २२) श्री. शाम खळदकर पुणे. २३) श्री. संजय सोनवणे पुणे. २४) श्री. भोलानाथ समेळ मुंबई. २५) श्री. तुकाराम म. दैठणकर पुणे. २६) श्री. ज्ञानोबा द. दैठणकर पुणे. २७) श्री. अबदूल कादर निझामां पुणे. २८) श्रीमती मंगला शिरोडकर मुंबई. २९) श्री. देवीदास वाघचौरे पुणे. ३०) श्री. अनंतराव शिरोडकर मुंबई. ३१) श्री. हटकर मुंबई. ३२) श्री. चंद्रकांत सातनाक मुंबई. ३३) श्री. सदाशिवराव जाधव मिरज. ३४) श्री. राजाभाऊ देशपांडे पुणे. ३५) श्री. खांसाहेब गुलाब रसूल पुणे. ३६) श्री. जगन्नाथशेठ अगरवाल पुणे. ३७) श्री. मधुकर उपाध्याय पुणे. ३८) श्री. वद्रस्वामी नरसय्या पुणे. ३९) श्री. अजित कुलकर्णी पुणे. ४०) श्री. रघुनाथ सांडभोर पुणे. ४१) श्री. सपन मंत्री पुणे. ४२) श्रीमती सुलभा मंत्री पुणे. ४३) श्रीमती वीणा मुलेरकर पुणे. ४४) श्री. रत्नाकर

महंत पुणे. ४५) श्री. नितीन मंत्री पुणे. ४६) श्री. शिवाजी धुमाळ शिरडी. ४७) श्री. आप्पा सामंत, विरार. ४८) श्री. श्याम सुंदर भेडा संगमनेर. ४९) श्री. शिवराम बिडवे पुणे. ५०) श्री. कलानृत्य मुंबई. ५१) श्री. नामदेव भिरमगार पुणे. ५२) श्री. केशव बिडवे पुणे. ५३) श्री. आमनापूरकर पं. रा. पुणे. ५४) श्री. सीताराम बा. पवार पुणे. ५५) श्री. राजकुमार अं. बार्शिकर अ. नगर. ५६) श्री. दामूअण्णा दळवी श्रीरामपूर. ५७) श्री. विठ्ठल वि. मांजरेकर शिरडी. ५८) श्री. चंद्रशेखर गाडगीळ पुणे. ५९) श्री. वसंतराव देवळणकर पुणे. ६०) श्री. बंडोपंत सोलापूरकर पुणे. ६१) श्री. पांडूरंग कि. लाखे पुणे. ६२) श्री. जयंत दामले पुणे. ६३) सौ. सविता गीजरे शिरडी. ६४) श्री. नागेश म. बोराडे. ६५) श्री. ज्ञानबा ता. बाडेकर शिरडी. ६६) श्री. एकनाथ मोटकर ग्वाल्हेर. ६७) श्री. एकनाथ तूपे चाळीसगाव. ६८) श्री. पुंडलीक ज. वाघ येवला. ६९) श्री. ईश्वर पुं. वाघ येवला. ७०) श्री. निवृत्ती कि. वाघ येवला. ७१) श्री. तुकाराम कांबळे पुणे. ७२) श्री. वाडेकर जगन्नाथ अ. नगर. ७३) श्री. बाबासाहेब गुरव शिरडी. ७४) श्री. ज्ञानोबा ज. नारकर पुणे. ७५) श्री. रावसाहेब देशमुख अमरावती. ७६) स्वामी रामानंद बिलारी ७७) श्री. लक्ष्मण द. राऊत अ. नगर. ७८) श्री. विजय ग. राऊत अ. नगर. ७९) श्री. राजू द. राऊत अ. नगर. ८०) श्री. चंद्रकांत गुजर पुणे. ८१) श्री. चंद्रकांत वाघ पुणे. ८२) श्री. अनंता पाटील पुणे. ८३) श्री. अशोक पवार पुणे. ८४) श्री. राजू जव्हेरी पुणे. ८५) श्री. रामनाथ कामत बोरीवली ८६) श्री. राजू हसनानी पुणे. ८७) श्री. वसंत दा. रासने पुणे. ८८) श्री. वसंत बा. जोशी मुंबई. ८९) श्री. वसंत कांबळे मुंबई. ९०) श्री. सुरेंद ए. चिपकर मुंबई. ९१) श्री. भाई पाव मुंबई. ९२) श्री. विलास य. पावसकर मुंबई. ९३) श्री. रघुनाथ सोनार शिरडी. ९४) श्री. रमेश अंजलीकर. ९५) अमरावती बॅण्ड पथक. श्री काकुरामद अढाळगे. ९६) श्री. मनोहर अढाळगे. ९७) श्री. सुरेश अढाळगे अमरावती. ९८) श्री. गुलाबराव अढाळगे, अमरावती. ९९) श्री. नथ्थु वानखडे, अमरावती. १००) श्री. अण्णाजी पोडे. १०१) श्री. सुभाष साबळे. १०२) श्री. रमेश गायकवाड. १०३) श्री. महादेवराव साबळे. १०४) श्री. सुधाकर तायडे, अमरावती. १०५) श्री. सुधाकर ना. कामतेकर, मुंबई. १०६) श्री. अंध कलाकार नांदेड. १०७) श्री. अजय प्रकाश श्रीवास्तव, जबलपूर. १०८) ह. भ. प. दत्तु श. घुमरे आणि बेहेला जुंगा भजन मंडळी, निफाड. १०९) श्री. एम. एन. बच्चा अ. नगर. ११०) भजन मंडळ गोलबाजार छियाना जबलपूर. १११) श्री. विलास शा. उपाध्ये.

**माननीयांच्या भेटी—**

१) मा. श्री. ए. जी. पवार. व्हाईस चेअरमन महाराष्ट्र विधान परिषद, मुंबई
२) मा. श्री. चोपडे. डायरेक्टर ऑफ अॅग्रीकलचर महाराष्ट्र.
३) मा. श्री. डी. उपाध्याय आय. ए. एस. जिल्हाधिकारी जयपूर. राजस्थान.
४) मा. श्री. विक्रम वर्मा. पार्लमेंटरी सेक्रेटरी गव्हर्मेंट ऑफ म. प्र. भोपाळ.
५) मा. श्री. के. बी. जितकर IAS जिल्हाधिकारी अहमदनगर.
६) मा. श्री. जसवंतसिंग. निवृत्त सुपरिमकोर्ट जज्ज न्यु दिल्ली.
७) मा. श्री. एस. एस. सोहनी IAS उप सचिव भारत सरकार.
८) मा. श्री. एन. पी. भणंगे प्रांत ऑफिसर संगमनेर.
९) मा. रमाकांत कुलकर्णी, सी. आय. डी. डी. आय. जी. महाराष्ट्र
१०) मा. श्री. राजीव अगरवाल IAS अॅडि. जिल्हाधिकारी अ. नगर
११) मा. श्री. व्ही. एस. प्रधान. चेअरमन मध्यप्रदेश राज्य परिवहन मंडळ भोपाळ.
१२) मा. स्वामी रामबाबा, मुंबई
१३) मा. श्री. यशवंतराव गडाख, जिल्हा परिषद अध्यक्ष अ. नगर.
१४) मा. श्री. जोशी, IAS सी. इ. ओ. अ. नगर.
१५) मा. श्री. एम जे. पिशोरी, ऑफ टाँगा-टांझानिया.
१६) मा. श्री. लाल मॅनेजींग डायरेक्टर कॉटन न्यू दिल्ली.
१७) मा. श्री. प्रेमानंद यार्दी असि. कमिशनर, पुणे.
१८) मा. श्री. सी. आर. रंगनाथ IAS एक्यु डायरेक्टर D. P. A. P. अ. नगर
१९) मा. श्री. पी. बी. सावंत, हायकोर्ट जज्ज मुंबई.
२०) मा. श्री. डॉ. के. जी. देशमुख चेअरमन महाराष्ट्र प. स. कमिशन. मुंबई
२१) मा. श्री. माधवराव माने मेंबर म. प. स. कमिशन. मुंबई.
२२) मा. श्री. एम. एस. आपटे असि जनरल मॅनेजर बडोदा बँक मद्रास.
२३) मा. श्री. व्ही. व्ही. देव D. I. G. मुंबई.
२४) मा. श्री. बाळासाहेब भारदे अहमद नगर.
२५) मा. श्री. टोंबरे सुपरिटेंडींग इंजिनिअर एम. सी. बी. अ. नगर.

---

**हवापाणी** :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. सध्या थोडा थोडा पाऊस पडत आहे त्यामुळे वातावरण आल्हादकारक आहे.